# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १० मार्च, २०२५ / फाल्गुन १९, १९४६ (शके)**

**(१) महसूल मंत्री**
**(२) वने मंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) कृषी मंत्री**
**(५) सामाजिक न्याय मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**
**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

## राज्यातील सारथी, बार्टी, महाज्योती व टीआरटीआय या संस्थांमार्फत स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत

**(१) * ५८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारथी, बार्टी, महाज्योती व टीआरटीआय मार्फत सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांच्या प्रशिक्षणावर हजारो कोटींचा निधी खर्च केला जात असून याकरीता खाजगी क्लास चालकांकडून निविदा मिळविण्यासाठी मंत्रालयात तसेच अन्य उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना विविध प्रकारचे आमिष दिले जात असून उमेदवारांच्या प्रवेशासाठीदेखील मोफत टॅबचे आमिष दिले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी लेखी तसेच तोंडी निवेदन देऊनही सारथी, बार्टी, महाज्योती व टीआरटीआयकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सर्व स्वायत्त संस्थांमार्फत तसेच विद्यार्थी संघटनांकडून स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने घेण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्यादृष्टीने तसेच स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी शासनस्तरावर तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेला खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. याबाबत सदर संस्थेने तक्रारीत तथ्य नसल्याबाबतचा खुलासा शासनास सादर केला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जात पडताळणी जिल्हा समित्यांवर अध्यक्ष व अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत

**(२) * ४५२ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अभिजित वंजारी, श्री.हेमंत पाटील, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.कृपाल तुमाने, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे अंतर्गत राज्यातील ३६ जात पडताळणी समित्यांसाठी केवळ ३ अधिकारी व १३ अध्यक्ष कार्यरत असून त्यांचेकडे ३६ जिल्ह्यांचा कार्यभार असून त्यापैकी सोलापूर जात पडताळणी समितीच्या अध्यक्षांकडे तब्बल दहा जिल्ह्यांचा पदभार असल्याने राजकीय व्यक्ती, शासकीय नोकरदार, व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे जवळपास ४० हजार २९७ अर्ज प्रलंबित असून जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी विद्यार्थी व नोकरदारांना अनेक शासकीय योजनांचा लाभ घेता येत नसल्याने बार्टीने सदर कामे पूर्ण करण्यासाठी २२ अधिकाऱ्यांची केलेली मागणीही अद्याप प्रलंबित आहे, तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांवर उर्वरित ३२ अध्यक्ष व अधिकारी नेमण्याबाबत प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी महसूल विभागास दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समित्यांमधील रिक्त पदे भरण्यासाठी तसेच पूर्ण वेळ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात जिल्हानिहाय ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यान्वित आहेत. सदर समित्यांवरील अध्यक्षांची ३० पदे ही महसूल व वन विभागामार्फत अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातून भरण्यात येतात. उर्वरीत ६ पदे ही सामाजिक न्याय विभागांतर्गत अतिरिक्त आयुक्त तसेच मंत्रालयीन सह सचिव संवर्गातून भरण्याची तरतूद आहे. सदर समित्यांवरील अध्यक्ष या पदावर कार्यरत असलेल्या १४ अध्यक्षांपैकी १० अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) यांची भारतीय प्रशासन सेवेतील पदावर निवड झाल्याने अध्यक्षांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त झाली आहेत. सद्य:स्थितीत विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कोणताही मागासवर्गीय विद्यार्थी वंचित राहणार नाही याकरीता अध्यक्ष पद रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत असलेल्या अध्यक्षांकडे सोपविण्यात आलेला आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

सर्व समित्यांकडील एकूण ४०,११५ प्रकरणे दिनांक ३१/०१/२०२५ अखेर निकाली काढण्यात आली आहेत. तसेच ४७,०२७ प्रकरणे प्रलंबित असून, CET प्रवेशाबाबतची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणेबाबत महासंचालक, बार्टी यांनी त्यांचेस्तरावरुन सर्व समित्यांना निर्देश दिले आहेत. तसेच अध्यक्षांची रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याबाबत महसूल व वन विभागास व सामान्य प्रशासन विभागास दिनांक २१/०१/२०२५ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने अध्यक्षांची ३ पदे मंत्रालयीन विभागातील सह सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी दिनांक ३१/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये इच्छुकता मागविली आहे. तसेच महसूल व विभागाकडून दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये २९ अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातील अधिकाऱ्यांची अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर पदस्थापना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील ठिकाणांवरील १०२ नकाशे बनावट असल्याबाबत

**(३) * १५२ श्री.विक्रांत पाटील, श्री.सचिन अहिर, श्री.राजहंस सिंह, ॲड.अनिल परब, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाडच्या एरंगळ, मढ आयलंड, वर्सोवा आणि इतर पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील ठिकाणी भूमी अभिलेख कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मोठ्या उद्योगपतींच्या संगनमताने शासकीय नोंदी व साधारणत: १०२ नकाशे बदलून बनावट नकाशे जोडून सीआरझेड व ना-बांधकाम क्षेत्रात नियमांचे उल्लंघन करुन दुरुस्तीच्या नावाखाली नवीन बांधकामे करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) आणि नो डेव्हलपमेंट झोन (एनडीझेड) जमिनींना विकसित करण्यायोग्य बनविण्यासाठी भूमी अभिलेख विभागाच्या १९६७ च्या मूळ नकाशामधील नोंदीमध्ये फेरफार करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी बृहन्मुंबई पोलिसांच्या विशेष तपासणी पथकाने (एसआयटी) दोन सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांसह काही जणांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सीआरझेड व ना-बांधकाम क्षेत्रात नियमांचे उल्लंघन करून केलेले बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच सदर गैरव्यवहारात दोषी असणाऱ्या भूमी अभिलेख कार्यालय व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) उप अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर या कार्यालयांतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यातील एकूण ८८४ हद्द कायम मोजणी नकाशांपैकी १०२ नकाशांचे बनावटीकरण केल्याचे तसेच नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव कार्यालयातील मौजे मालवण, मौजे पोईसर व मौजे एरंगळ या गावातील आठ मूळ आलेखात छेडछाड केल्याचे सन २०२० मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल क्रिमिनल रिट याचिका क्र.१३५५२/२०२४ मधील सुनावणीदरम्यान मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २०/१०/२०२४ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपासणी पथक नेमण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन गोरेगांव पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.८२/२०२०, गु.र.क्र.९७/२०२१, गु.र.क्र.९८/२०२१ व खेरवाडी पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.४९०/२१ या चारही गुन्ह्यांचा तपास विशेष तपासणी पथकाकडे वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात आतापर्यंत २ सेवानिवृत्त शिपाई व ७ खाजगी व्यक्ती अशा एकूण ९ जणांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

तसेच सदर बनावट नकाशांच्या चौकशी प्रकरणी जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने सादर केलेला अहवाल स्विकारुन बनावट नकाशांप्रकरणी जबाबदार असलेल्या २ अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच १९ कर्मचाऱ्यांविरुध्दही विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखून आत्महत्याग्रस्त कुटूंबियांना मदत करण्याबाबत

**(४) * ८७२ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.विक्रम काळे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बदलते हवामान, सततचा कोरडा व ओला दुष्काळ, नापिकी व कर्जबाजारीपणामुळे ५६ महिन्यांमध्ये दररोज सरासरीने आठ शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असून मागील एक वर्षात मराठवाड्यात ९४८, अकोला जिल्ह्यात १५४, वर्धा जिल्ह्यात ११२, बीड जिल्ह्यात २६, अमरावती जिल्ह्यात १०५१ शेतकऱ्यांनी तर मंठा (जि.जालना) तालुक्यात माहे एप्रिल, २०२३ ते सप्टेंबर, २०२४ या कालावधीत १३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसून छत्रपती संभाजीनगर, अमरावती या विभागात सर्वाधिक तर नाशिक, नागपूर, सोलापूर व पुणे जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये लक्षणीय वाढ होत असून शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीची प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंठा तालुक्याचा ५० ते ७० टक्के डोंगरी भाग, सिंचनाचा मोठ्या प्रमाणात अनुशेष असून या तालुक्यातील शेती व्यवसायासाठी व शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी तसेच मागील २४ वर्षांमध्ये अमरावती जिल्ह्यातील उर्वरित १०८६६ व मागील वर्षातील १०५१ आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना पात्र ठरविण्याबाबत व त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
दिनांक ०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ या कालावधीत खालीलप्रमाणे शेतकरी आत्महत्या प्रकरणांची नोंद झालेली आहे.

| अ.क्र. | विभाग/ जिल्हा | एकूण आत्महत्या | शासन निकषा नूसार पात्र प्रकरणे | चौकशीसाठी प्रलंबित | मदत देण्यात आलेली प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर विभाग | ९५२ | ७०७ | १६७ | ४३३ |
| २ | बीड जिल्हा | २०५ | १६७ | १४ | १०८ |
| ३ | अमरावती विभाग | १०६९ | ४४१ | १७२ | ३३२ |
| ४ | अमरावती जिल्हा | २०० | १११ | २९ | १११ |
| ५ | अकोला जिल्हा | १६८ | ७२ | ३४ | ५२ |
| ६ | वर्धा जिल्हा | ११२ | ६५ | ३ | ६५ |

एप्रिल, २०२३ ते सप्टेंबर, २०२४ या कालावधीत मंठा (जि.जालना) तालुक्यात १४ शेतकरी आत्महत्या प्रकरणांची नोंद झाली असून, त्यापैकी १३ प्रकरणे शासन निकषानूसार पात्र ठरली आहेत. पात्र प्रकरणामध्ये निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभागात इतर विभागापेक्षा शेतकरी आत्महत्या प्रकरणांची नोंद जास्त प्रमाणात आहे. तथापि, नागपूर, नाशिक, सोलापूर व पुणे जिल्ह्यात लक्षणीय वाढ झालेली नाही. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाते.

महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २३/०१/२००६ अन्वये शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी मदत देण्याबाबत निकष निश्चित केले असून १) नापिकी, २) राष्ट्रीयकृत बँक / सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करु न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व ३) कर्जपरतफेडीचा तगादा या तीन कारणामुळे आत्महत्या घडली असल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये १ लक्ष इतकी मदत अनुज्ञेय आहे. ही मदत रुपये ३०,०००/- धनादेशाव्दारे व रुपये ७०,०००/- पोस्ट/बँकेच्या मासिक प्राप्ती योजनेमध्ये मृत शेतकऱ्यांच्या वारसाच्या नावे जमा करण्यात येत असून पात्र कुटुंबांना लवकरात लवकर मदत दिली जाते.

(३) ता.मंठा जि.जालना येथे सिंचनाचा अनुशेष शिल्लक नाही. तसेच हा डोंगरी प्रदेशात अधिसुचित नाही त्यामुळे शेती व्यवसाय व शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज सध्यस्थितीत देण्यात येत नाही.

(४) व (५) नैसर्गीक आपत्तीमुळे पीक नुकसान झाल्यास, मदत व पुनर्वसन कडून पीक नुकसानीबाबत मदत देण्यात येते. कृषी विभागामार्फत शासन परिपत्रक दिनांक ०४/०२/२०१९ अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत रुपये ६,०००/- आणि शासन निर्णय दिनांक १५/०६/२०२३ अन्वये नमो शेतकरी महासन्मान निधीअंतर्गत रुपये ६,०००/- असे एकूण रुपये १२,०००/- वार्षिक अनुदान देण्यात येत आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळणेबाबत शासन निर्णय दिनांक १८/०६/२०१९ अन्वये विविध विभागाकडून लाभ देण्यात येतात. याव्यतिरिक्त शेतकरी आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २४/०७/२०१५ अन्वये विविध विभागामार्फत त्या विभागांच्या उपाययोजना राबविण्यात येतात.

तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य भाव मिळणे, सिंचन सोई मध्ये वाढ करणे व समुदपदेशन केंद्रे संचलित करणे इ. योजना जिल्हा स्तरावर राबविण्यात येत आहेत.

मागील २४ वर्षात अमरावती जिल्ह्यात २८५६ शेतकरी आत्महत्यांची पात्र प्रकरणे आढळून आली आहेत. सर्व पात्र प्रकरणामध्ये निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तथापि, अमरावती विभागात मागील २४ वर्षात ९९६१ शेतकरी आत्महत्यांची पात्र प्रकरणे आढळून आली आहेत. त्यापैकी ९८३२ प्रकरणी मदत देण्यात आलेली आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढणेबाबत तसेच वारसांना निधी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत शासन स्तरावरुन सर्व विभागीय आयुक्तांना सुचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## बार्टी, सारथी आणि महाज्योतीच्या संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(५) * ४०८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सारथी मध्ये ९६९, बार्टी मध्ये ८६१ व महाज्योती मध्ये ८६९ संशोधन करणाऱ्या एकूण २६९९ विद्यार्थ्यांचे संशोधनाचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून १००% फेलोशिप मंजूर करण्याचे निर्देश असतानाही संबंधित विद्यार्थ्यांकडून कागदपत्रे पडताळणी, सहामाही अहवाल मागवून उपस्थिती व अन्य अनेक जाचक अटींचा समावेश केल्याने १००% फेलोशिप मिळण्यास अडचणी निर्माण झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम लवकरात लवकर मिळावी याकरीता सारथीने वित्त विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त संस्थांना निधी मंजूर करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना १००% फेलोशिप मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

अधिछात्रवृत्तीची रक्कम प्रदान करण्याआधी कागदपत्रे पडताळणी, सहामाही संशोधन अहवाल, उपस्थिती प्रमाणपत्र तपासणी करणे गरजेचे असून त्याची कार्यवाही युजीसी च्या नियमानुसार करण्यात येत आहे.

(३) याकरीता सुधारित अर्थसंकल्प २०२४-२५ मध्ये मागणी करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी बार्टीमार्फत एकूण पात्र ७६३ विद्यार्थ्यांपैकी प्रगती अहवालानुसार ३९९ विद्यार्थ्यांना पीएचडी नोंदणी दिनांकापासून प्राप्त प्रगती अहवालानुसार अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात आली आहे. महाज्योतीमार्फत एकूण पात्र ९०१ विद्यार्थ्यांपैकी सहामाही संशोधन अहवाल सादर केलेल्या विद्यार्थ्यांना रुपये ९.३३ कोटी इतका निधी वितरीत केला आहे. तसेच, सारथीला ९६९ विद्यार्थ्यांपैकी ८३३ विद्यार्थ्यांचे नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवत्ती अदा करण्यासाठी जून, २०२४ पर्यंत अर्ज प्राप्त झाले आहेत. त्या पैकी ६५५ विद्यार्थ्यांचे अर्ज तपासले असून ३२४ विद्यार्थ्यांना रक्कम रुपये २४.८६ कोटी अधिछात्रवृत्ती अदा करण्यात आली आहे. तसेच उर्वरित ३३१ अर्जदारांचे वित्तीय आदेश तयार करण्याची प्रक्रिया सूरू असून १७८ अर्ज तपासनी व विद्यार्थी स्तरावर त्रुटीपुर्तते करीता प्रलंबित आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: अहिल्यानगर, नाशिक, जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील वनक्षेत्रालगतच्या मानवी वस्त्यांवरील बिबट्यांचे हल्ले रोखण्याबाबत

**(६) * ३५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अहिल्यानगर, नाशिक, जळगाव व नंदुरबार या जिल्ह्यातील वनक्षेत्रालगत असलेल्या मानवी वस्त्यांवरील बिबट्यांच्या हल्ल्यात लक्षणीय वाढ होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानवी वस्त्यांवरील वारंवार होणारे हल्ले रोखण्यासाठी बिबट्यांची नसबंदी करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडे सादर करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वेळोवेळी करुनही अद्याप यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्याबाबत तसेच राज्यातील बिबट्यांचे वाढते हल्ले रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांचा नाशिक वनवृत्तात व जळगाव आणि नंदुरबार जिल्ह्यांचा धुळे वनवृत्तात समावेश होतो.

नाशिक वनवृत्तात व धुळे वनृत्तात माहे जानेवारी, २०२५ मध्ये बिबट्याच्या हल्ल्यामुळे मनुष्य मृत्यूच्या ३, मनुष्य जखमीच्या २ घटना निदर्शनास आल्या आहेत.

(२) व (३) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम १२ अन्वये प्रायोगिक तत्वावर जुन्नर वन विभागातील ऊस पिकामध्ये वास्तव्य करणाऱ्या बिबट्यांना जेरबंद करुन नसबंदी करण्याचा प्रस्ताव माहे डिसेंबर, २०२४ मध्ये केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत/ चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असून त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, निर्धूर चुली, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १.७७ लाख शेतकऱ्यांचे सूक्ष्म सिंचन योजनेचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(७) * २८८ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) “प्रति थेंब अधिक पीक” या सूक्ष्म सिंचन योजनेचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे ७१६ कोटी रुपयांचे अनुदान थकीत राहिल्यामुळे राज्यातील १.७७ लाख शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी या योजनेचे अर्ज स्वीकारणे कृषी विभागाने थांबविले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा जिल्ह्यातील सुमारे ३.५ हजार शेतकरी ठिबक सिंचनाच्या अनुदानापासून वंचित असल्याचे, कोल्हापूर जिल्ह्यातील दीड हजार शेतकऱ्यांचे अंदाजे ७ कोटी रुपयांचे अनुदान प्रलंबित असल्याचे, सांगली जिल्ह्यातील ७२७० शेतकऱ्यांना सन २०२३-२०२४ मधील १८ कोटी रुपयांहून अधिक रकमेचे अनुदान मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच सांगली जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाने याबाबत मागील वर्षी पाठविलेल्या प्रस्तावावर शासनाने अद्याप निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाश्वत सिंचन योजनेच्या माध्यमातूनदेखील देण्यात येणाऱ्या राज्य पूरक अनुदानाचे ११७ कोटी असे शासनाकडे ८३३ कोटी रुपये प्रलंबित असून सन २०२४-२५ साठी निधीची तरतूदच करण्यात आली नसून नव्या आर्थिक वर्षात सुमारे तीन लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या सुक्ष्म सिंचनाच्या प्रस्तावांना पुर्वसंमती देण्यात आलेली नसल्याचे तसेच जनरल कॅटेगिरीसाठी लॉटरी देखील काढण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सातारा, सांगली व कोल्हापूरसह राज्यातील सर्व शेतकऱ्यांना उपरोक्त योजनेचे थकीत अनुदान त्वरित वितरित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) नाही.

सन २०२३-२४ मधील सर्वसाधारण प्रवर्गातील १७७३२५ प्रलंबित लाभार्थ्यांसाठी शासनाकडे तिसरा हप्ता रुपये ७१६.१० कोटी निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक १२/११/२०२४ रोजी सादर करण्यात आलेला होता. दिनांक २२/०१/२०२५ रोजी सर्वसाधारण प्रवर्गासाठी शासनाकडून तिसरा हप्ता रुपये २१३.१४ कोटी निधी वितरीत झालेला असून सदरील निधी जिल्हास्तरावर वाटप करण्यात आलेला असून रुपये ११७.९० कोटी निधीचे मागणीपत्र जिल्हास्तरावरून कोषागारात सादर करण्यात आलेले आहे व शिल्लक निधी खर्च करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावरून सुरु आहे. प्राप्त निधी व्यक्तीरिक्त सन २०२३-२४ मधील प्रलंबित लाभार्थ्यांसाठी अजून रुपये ५०२.९६ कोटी निधी आवश्यक आहे. सन २०२४-२५ मध्ये आजपर्यंत ५२१९१९ अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(२) नाही. सन २०२४-२५ या वर्षात सांगली जिल्ह्यासाठी रुपये १०.१६ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून २५८२ एवढ्या लाभार्थ्यांना रुपये ६.९९ कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे व याव्यतिरिक्त सांगली जिल्ह्यासाठी रुपये १०.७१ कोटी निधीची आवश्यकता आहे.

कोल्हापूर जिल्ह्यासाठी रुपये ५.५२ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून ११६१ एवढ्या लाभार्थ्यांना रुपये ३.५२ कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे व याव्यतिरिक्त कोल्हापूर जिल्ह्यासाठी रुपये १.९३ कोटी निधीची आवश्यकता आहे.

सातारा जिल्ह्यासाठी रुपये ५.३६ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला असून १७८९ एवढ्या लाभार्थ्यांना रुपये ५.०५ कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे व याव्यतिरिक्त सातारा जिल्ह्यासाठी रुपये ५.२५ कोटी निधीची आवश्यकता आहे.

शिल्लक निधी खर्च करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावरून सुरु आहे.

(३) अंशतः खरे आहे. सन २०२४-२५ मध्ये आजपर्यंत ५२१९१९ अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी अनुसुचित जाती व जमाती प्रवर्गातील ४७०७८ अर्जाची लॉटरी काढण्यात आली असून उर्वरित ४७४८४१ अर्ज सर्वसाधारण प्रवर्गाचे आहेत. निधी अभावी दिनांक १६/०१/२०२४ पासून सर्वसाधारण प्रवर्गाची लॉटरी काढण्यात आलेली नाही.

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत सन २०२३-२४ मधील प्रलंबित लाभार्थ्याकरीता सदर निधी व्यतिरिक्त रुपये १५६.१० कोटी निधीची आवश्यकता होती. त्याअनुषंगाने दिनांक १४/०२/२०२५ रोजी रुपये १४४.०० कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

(४) केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निधीमधून लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) नाही. सन २०२३-२४ मधील सर्वसाधारण प्रवर्गातील १७७३२५ प्रलंबित लाभार्थ्यांसाठी शासनाकडे तिसरा हप्ता रुपये ७१६.१० कोटी निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक १२/११/२०२४ रोजी सादर करण्यात आलेला होता. दिनांक २२/०१/२०२५ रोजी सर्वसाधारण प्रवर्गासाठी शासनाकडून तिसरा हप्ता रुपये २१३.१४ कोटी निधी प्राप्त झालेला असून सदरील निधी जिल्हास्तरावर वाटप करण्यात आलेला असून रुपये ११७.९० कोटी निधीचे मागणीपत्र जिल्हास्तरावरून कोषागारात सादर करण्यात आलेले आहे व शिल्लक निधी खर्च करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावरून सुरु आहे. प्राप्त निधी व्यक्तीरिक्त सन २०२३-२४ मधील प्रलंबित लाभार्थ्यांसाठी अजून रुपये ५०२.९६ कोटी निधी आवश्यक आहे. सन २०२४-२५ मध्ये आजपर्यंत ५२१९१९ अर्ज प्राप्त झालेले आहेत.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळेत निकृष्ट दर्जाच्या भाज्यांचा पुरवठा केल्याबाबत

**(८) * २७३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सचिन अहिर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या चाफेवाडी, डोंगरपाडा, पिंगळस, भालिवडी या आदिवासी आश्रमशाळांमधील मुलांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराकरिता निकृष्ट दर्जाच्या भाज्यांचा पुरवठा केला जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या आहाराचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याने सदर प्रकरणी संबंधित दोषी असलेले आश्रमशाळेतील अधिक्षक व ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली तसेच आदिवासी आश्रमशाळांमध्ये सकस पोषण आहार देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक वुईके :** (१) कर्जत (जि.रायगड) येथील चाफेवाडी, डोंगरपाडा, पिंगळस, भालिवडी या चार शासकीय आश्रमशाळेमध्ये सडक्या, नासक्या भाज्यांचा पुरवठा केला जात असल्याबाबत "दैनिक सामना" वर्तमानपत्रात दिनांक ०६/०१/२०२५ रोजी बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, प्रकल्प अधिकारी, पेण यांच्याअंतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळेमध्ये संबंधित पुरवठादार संस्थेकडून दिनांक ०७/१२/२०२४ पासून भाजीपाला पुरवठा सुरु झालेला आहे. सदरचा पुरवठा प्रथमतः खराब किंवा काही भाजीपाला चांगल्या दर्जाचा नसल्याचे आढळून आल्याने सदरील भाजीपाला त्यावेळी मुख्याध्यापक/अधिक्षकांनी न स्विकारता परत केला व चांगल्या दर्जाचा भाजीपाल्याचा पुरवठा करणेबाबत पुरवठादार संस्थेला सुचित केले. तद्‌नंतर संबंधित पुरवठादार संस्थेमार्फत या शासकीय आश्रमशाळांना चांगल्या दर्जाचा भाजीपाला पुरवठा होत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गतच्या अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना मानधन/वेतनाची थकबाकी अदा करण्याबाबत

**(९) * ५५२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) आदिवासी विकास विभागाअंतर्गत अनुदानित आश्रमशाळेतील ११५५ शिक्षकांना मानधन/वेतनाची थकबाकी अदा करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देऊनही अद्याप त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षकांना मानधन/ वेतनाची थकबाकी अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच मानधन/ वेतन अदा करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक वुईके :** (१) होय. हे खरे आहे.
(२) शासनाच्या दिनांक ०६/१२/२००५ व दिनांक २५/०९/२००६ च्या शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळेतील अनुक्रमे ५९९ व ६२३ अशा एकूण १२२२ शिक्षकांच्या प्रलंबित मान्यता मागील थकबाकी न देता नियमित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तथापि, थकबाकी मिळण्याकरीता मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांमध्ये मा.न्यायालयाने वेतन थकबाकी अदा करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे, मुंबई उपनगर व मुंबई शहरातील कांदळवन क्षेत्र नष्ट होत असल्याबाबत

**(१०) * ३१८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कांदळवनाच्या जागेवर अनेक लोकांनी सन २०२१ ते २०२३ या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये बेकायदेशीररित्या अतिक्रमण करुन ९३ हेक्टर कांदळवन क्षेत्र नष्ट केल्याचे तसेच मुंबई उपनगरातील १८ हेक्टर व मुंबई शहरातील ३ हेक्टर कांदळवन क्षेत्र अतिक्रमणधारकांनी नष्ट केल्याचे सन २०२३ च्या भारतीय वन सर्वेक्षण अहवालातून नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कांदळवनाचे पर्यावरणाच्यादृष्टीने महत्व लक्षात घेता कांदळवन नष्ट होऊ नयेत यासाठी कांदळवन संरक्षण किंवा निवारण समिती घटीत करण्याची मागणी परिसरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यासह मुंबई शहर व उपनगरातील कांदळवन क्षेत्रे नष्ट करुन त्यावर अतिक्रमण करणाऱ्या दोषींवर व कांदळवन सुरक्षेची जबाबदारी असणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली, तसेच कांदळवन संरक्षण किंवा निवारण समिती घटीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे अंशत: खरे आहे. भारतीय वन सर्वेक्षण अहवाल, २०२३ मध्ये प्रकाशीत केलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र राज्यातील सागरी जिल्ह्यातील कांदळवन वृक्ष आच्छादन (Mangrove Tree Cover) चे क्षेत्रात सन २०२१ च्या तुलनेत सन २०२३ मध्ये १२३९ हे. इतकी वाढ झालेली आहे. तथापि, ठाणे, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात अनुक्रमे ९३ हे., ३ हे., व १८ हे. कांदळवन वृक्ष आच्छादन कमी झाल्याचे प्रकाशित झाले आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, कांदळवनाच्या ऱ्हासासंदर्भात प्राप्त तक्रारींचे प्रभावीपणे निराकरण करण्यास्तव जिल्हा, विभागीय व राज्य स्तरावर कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समित्या राज्य शासनाद्वारे स्थापन केलेल्या आहेत.

(३) सन २०२१ ते २०२३ या कालावधीत ठाणे जिल्ह्यासह मुंबई शहर व उपनगरातील विविध शासकीय यंत्रणेकडून कार्यरत जनहितार्थ प्रकल्पांकरीता वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत १७०.१९२९ हे. इतके क्षेत्र वळतीकरण करण्यात आलेले आहे.

तसेच सन २०२१ ते २०२३ या २ वर्षाच्या कालावधीत ठाणे जिल्ह्यासह मुंबई शहर व उपनगरातील कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमण धारकांविरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील तरतुदीनुसार एकूण ५५ वनगुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनार्थ क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी व महाराष्ट्र सुरक्षा बल (MFS) यांच्या समवेत गस्त करण्यात येते. तसेच कांदळवना संदर्भात तक्रारींसाठी मॅग्रोव्ह सुरक्षा ॲप सन २०२४ मध्ये कार्यन्वीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांच्या विविध मागण्यांबाबत

**(११) * ७८२ श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी अनुसूचित जातीच्या १६५ आश्रमशाळांना VJNT शाळा संहितेनुसार नियमित वेतनश्रेणीनुसार शंभर टक्के अनुदान मंजूर करणे, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता, संच मान्यता, सेवा सातत्य प्रदान करणे व विद्यार्थी परिपोषण १०० टक्के प्रमाणे देण्यासंदर्भातील मागण्यांसाठी सदर कर्मचाऱ्यांनी दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी मुंबई येथील आझाद मैदान येथे आमरण उपोषण केल्याचे तसेच दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विविध मागण्यांच्यासंदर्भात निवेदन दिल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास अद्यापपर्यंत मान्यता मिळाली नसल्याचे निदर्शनास आले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय.

(२) होय.

(३) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी शाळा योजनेतील आश्रमशाळांना तपासणीच्या अधीन राहून नियमानुसार अनुदान देण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सारकिन्ही व जनुना (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) परिसरातील गावांमधील शेतकऱ्यांना सोयाबीन पिकाचे अनुदान मिळणेबाबत

**(१२) * ८४१ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारकिन्ही व जनुना (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) परिसरातील गावांमध्ये खरीप हंगामात पावसाअभावी सोयाबीन पिकाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून शासनाकडून हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान देण्यात येणार होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून सोयाबीन पिकाच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दोन हेक्टरी मर्यादित प्रति हेक्टर पाच हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सामुहिक व वैयक्तिक खातेदारांकडून सेतू केंद्रातील संमतीपत्र व प्रतिज्ञापत्र कृषी सहाय्यकांकडे जमा करुनही खातेदारांच्या बँक खात्यावर अद्याप नुकसान भरपाईची रक्कम जमा झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई लवकर मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे आहे.

दिनांक २९ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयानुसार सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट रुपये १००० तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रुपये ५,००० (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थ सहाय्य देण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर योजनेंतर्गत राज्यात ७३,३७,०३० खातेदारांना रुपये २८१९.७२३८७ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच, वैयक्तिक शेतकऱ्यांची आधार संमती व सामाईक शेतकऱ्यांचे आधार संमती व ना-हरकत प्रमाणपत्र कृषी विभागास उपलब्ध करुन देण्यासाठी व संबंधितांच्या आधार संलग्न बँक खात्यात अर्थसहाय्य निधी जमा करण्यासाठी विविध माध्यमाद्वारे प्रसिद्धी देण्यात येवून त्रुटींची पूर्तता करून घेण्याची व त्यानुसार पात्र खातेदारांना लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली खाते (NPS) सुरु करणेबाबत

**(१३) * ३३५ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आश्रमशाळेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नावे राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली खाते (NPS) सुरु करण्याचे अनिवार्य असताना अद्यापही खाते सुरु केले नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन आदिवासी आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली खाते (NPS) खाते सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक वुईके :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्थाद्वारा अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींसाठी चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील १०० टक्के अनुदानित पदांवरील शिक्षक व शिक्षकेतर पदांवर दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या व राज्याची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू असणाऱ्या कर्मचाऱ्यांना तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) लागू करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (मुंबई) पूर्वेकडील दिंडोशीच्या डोंगरावरील वणव्याच्या घटना रोखण्याबाबत

**(१४) * १८१ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव पूर्वेकडील दिंडोशीच्या डोंगरावर दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मोठ्या प्रमाणावर वणवा लागल्याची घटना घडली असून दरवर्षी हिवाळयात दिंडोशीच्या या डोंगरपट्ट्यात वणवा लागण्याच्या घटना घडत असून सन २०२१ मध्ये ९ वेळा, सन २०२२ मध्ये ६ वेळा वणवा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पट्ट्यात सातत्याने वणवा लागत असल्याने त्याबाबतची चौकशी करण्याची मागणी ‘वनशक्ती’ या संस्थेच्या संचालकांनी वन विभागाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणी सातत्याने वणवा लागत असलेल्या घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तसेच पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असेलल्या दिंडोशीच्या डोंगरावर सातत्याने लागणाऱ्या वणव्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) मौजे, मालाड न.भू.क्र.८२७/अ/४ अ/१ आणि न.भू.क्र.८२७ /अ/४अ/२ मधील मे.डी.बी.रिअल्टी लि. व मे.फेरानी हॉटेल्स यांच्या खाजगी क्षेत्रावर दिनांक २८/१२/२०२४ रोजी वणवा लागला होता. मुंबई अग्निशमन दलाच्या दिनांक २८/०२/२०२५ रोजीच्या चौकशी अहवालात नमूद केल्याप्रमाणे, सन २०२१ मध्ये ८ वेळा सन २०२२ मध्ये ८ वेळा दिंडोशीच्या डोंगरावर आगी लागलेल्या आहेत.

वनशक्ती या संस्थेचे संचालक स्टॅलीन दयानंद यांची ई-मेलव्दारा तक्रार प्राप्त झाली आहे. त्या सर्व आगी ह्या किरकोळ व छोट्या स्वरुपाच्या होत्या. १६ आगींपैकी १५ आगींचे कारण पेटती सिगारेट/ बिडी निष्काळजीपणे टाकल्यामुळे व एक आग ही फटाक्यांच्या ठिणगीमुळे लागली आहे. सदर क्षेत्र हे वनेत्तर नागरी क्षेत्र असल्याने वन विभागाचा महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ व भारतीय वन अधिनियम, १९२७ लागू होत नाही. तरी या क्षेत्रातील आगींच्या नियंत्रणाकरीता वन विभागाच्या क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यांत्रिकीकरणातील शेती अवजारांवर आकारला जाणारा १८ टक्के जीसटी रद्द करण्याबाबत**

**(१५) * ३६९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी हे शेती क्षेत्रात मजुर मिळत नसल्यामुळे यांत्रिकीकरणाकडे वळले असून कृषी विभागाच्या विविध योजनांमधून अनुदान मिळण्यासाठी वर्षभरात शासनाकडून शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांची लॉटरी निघाली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नसून कीटकनाशके, अवजारे बी-बियाणे तसेच यांत्रिकीकरणातील शेती अवजारांवर आकारला जाणारा १८ टक्के जीएसटी रद्द करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत असल्याने शासनाकडून सदर जीएसटी रद्द करण्याची मागणी जीएसटी कौन्सिलकडे करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी यांत्रिकीकरणातील शेती अवजारांवर आकारला जाणारा १८ टक्के जीएसटी रद्द करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

सन २०२४-२५ मध्ये केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप अभियान योजनेंतर्गत अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गासाठी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ व दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी सोडत (लॉटरी) काढण्यात आलेली आहे. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील अनु.जाती प्रवर्गाच्या ३३८ व अनु.जमाती प्रवर्गाच्या ०७ अशा एकूण ३४५ लाभार्थ्यांची निवड झालेली असून १६९ लाभार्थ्यांकडून अर्ज रद्द करण्यात आले आहेत. निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी २४ लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात

आले असून उर्वरित १५२ लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ११ मार्च, २०२४ रोजी सोडत काढण्यात आलेली आहे. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यामधून ५०३० लाभार्थ्यांची निवड झाली असून त्यापैकी ३२१८ लाभार्थ्यांकडून अर्ज रद्द करण्यात आले असून प्रक्रियेत असलेल्या १८१२ लाभार्थ्यांपैकी आज अखेर १६६६ लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे. उर्वरित १४६ लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची कार्यवाही चालू आहे.
(२) व (३) होय.

पेरणीसाठी लागणारे बी बियाणे यावर शून्य % कर आहे. बहुतांश यांत्रिकीकरणाकरीता शेती अवजारांवर १२% कर आहे. कीटकनाशकांवर १८% कर आहे आणि रासायनिक खतांवर ५% कर आहे. त्यामुळे यांत्रिकीकरणातील शेती अवजारांवर तसेच कीटकनाशके यावरील कर कमी करुन तो ५% इतका करण्यात यावा. तसेच रासायनिक खतांवरील कर हा शून्य % करण्यात यावा. यासंदर्भातील प्रस्ताव राज्यकर सहआयुक्त मुंबई यांच्या कार्यालयामार्फत जीएसटी कौन्सिलच्या उपसमितीकडे विचारार्थ सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पीक विमा योजनेतील गैरव्यवहार रोखून जिओ टॅगिंग करणेबाबत

**(१६) * ३२६ श्रीमती चित्रा वाघ, श्री.सुनिल शिंदे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बीड जिल्ह्यात सन २०२३ मध्ये शासकीय जमिनीवर विमा भरून करण्यात आलेल्या पीक विमा गैरव्यवहारातील दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात न आल्याने त्यांनी सन २०२४ मध्येही फळबागा अस्तित्वात नसताना विमा भरला असल्याचे तसेच परभणी जिल्ह्यात ९६ सामायिक सेवा केंद्रानी सुमारे १० हजार अर्जांद्वारे २३ हजाराहून अधिक हेक्टरवरील पिकांचा बनावट विमा उतरविला असल्याचे व ११ गावांना भौगोलिक क्षेत्र उपलब्ध नसतानाही गावे पीक विमा पोर्टलवर दाखविण्यात आल्याचे तसेच हिंगोली जिल्ह्यात १७०० शेतकऱ्यांच्या नावे बोगस पीक विमा काढण्याचा प्रयत्न झाल्याचे तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यात शासकीय जमिनीवर पीक विमा काढण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सातारा जिल्ह्यातील १८,७५५ कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष कांद्याची लागवड न करता पिकविम्याचा लाभ घेतल्याचे तसेच रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील हनमंतवाडी, काळेवाडी, पानगांव त्याचबरोबर लातूर, नांदेड, परभणी, बीड व जालना इ. जिल्ह्यात शेतकऱ्यांची नावे दाखवून विम्याचे पैसे परस्पर परळी व धर्मापूरी (जि.बीड) बँकेतील खात्यात वळविल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी चौकशीचे आदेशही दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लातूर, नांदेड, बीड, परभणी, हिंगोली, सातारा व इतर जिल्ह्यात एक रुपयात बोगस पीक विमा काढणाऱ्या संबंधित दोषींवर तसेच उक्त प्रकरणी सहभाग असलेल्या कृषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच पीक विमा प्रक्रियेचे जिओ टॅगिंग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) राज्यात खरीप हंगाम २०२३ पासून एक रुपयामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप २०२२ मधील ९५ लाख अर्जांच्या तुलनेत खरीप २०२३ मध्ये १७० लाख अर्जांव्दारे शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग नोंदविला असून ११३ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे.

खरीप २०२३ मध्ये विविध कारणास्तव उदा. परस्पर दुसऱ्या शेतकऱ्याच्या जमिनीवर विमा काढणे, शासकीय जमिनीवर विमा काढणे, नगरपालिका/ महानगरपालिकांच्या अकृषक क्षेत्रावर विमा काढणे, सार्वजनिक संस्थांच्या जमिनीवर विमा काढणे, ७/१२ व ८अ वरील क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रावर विमा काढणे, अधिसूचित पिकाची लागवड नसताना त्या पिकाचा विमा काढणे, अशा बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. यासंदर्भात खरीप २०२३ मध्ये २,८५,४६८ अपात्र अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत.

खरीप हंगाम २०२३ मध्ये बीड जिल्ह्यात सुमारे ७७९२ अयोग्य अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत. ११ सामायिक सुविधा केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत. तसेच, २४ सामायिक सुविधा केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

राज्यात खरीप हंगाम २०२४ मध्ये आतापर्यंत ४,३०,४४३ अयोग्य अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत. त्यात बीड जिल्ह्यातील १,११,२०५ व हिंगोली जिल्ह्यातील २,२९२ अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत.

परभणी जिल्ह्यातील २५ गावात १३,०७३ अर्जांव्दारे ३०,४६६ हेक्टर क्षेत्रावर अयोग्य विमा उतरविल्याचे निदर्शनास आले असून सदरचे विमा अर्ज रद्द करण्यात आले आहेत.
(२) सातारा जिल्ह्यात खरीप २०२४ मध्ये कांदा पिकांचे १८,५१३ अयोग्य विमा अर्ज रद्द करण्यात आले आहेत.

खरीप २०२४ मध्ये लातूर जिल्ह्यात ५,२५७, नांदेड जिल्ह्यात ५,४७७, परभणी जिल्ह्यात २२,१६२, आणि जालना जिल्ह्यात ११,२३९ विमा अर्ज अयोग्य/ अपात्र आढळून आले असून सदरचे विमा अर्ज रद्द करण्यात आले आहे. सदर अयोग्य विमा अर्जांना कोणतीही नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.
(३) हे खरे आहे.
(४) राज्यात अयोग्य विमा अर्जांची पडताळणी करुन ते रद्द करण्यात आलेले आहेत. तसेच, सदर अयोग्य अर्जांसाठी शासनाने कोणतीही विमा हप्ता रक्कम विमा कंपन्यांना अदा केलेली नाही. अयोग्य विमा नोंदणी प्रकरण संदर्भात, खरीप २०२३ मध्ये ११ सामायिक सुविधा केंद्राचे (C.S.C.) परवाने रद्द करण्यात आले असून २४ सामायिक सुविधा केंद्र चालकांवर (C.S.C.) गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. तसेच, सन २०२४ मध्ये ९६ सामायिक सुविधा केंद्राचे (C.S.C.) परवाने रद्द करण्यात आलेले आहेत.

राज्यात फळपिकांच्या विमा संरक्षीत क्षेत्राचे जिओ टॅगिंग करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच अन्नधान्य पिकांची १००% ई-पीक पाहणी बंधनकारक करण्याचे विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (बोरिवली, मुंबई) येथील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(१७)** * **१६९ श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पर्यावरणीयदृष्टया संरक्षित संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील (बोरिवली, मुंबई) अनधिकृत बांधकामे तसेच अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबतचे आदेश सन १९९७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने देऊनही इतकी वर्षे झाली तरीही त्याची ठोस अंमलबजावणी केली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांमुळे राष्ट्रीय उद्यानाचे पर्यावरणीयदृष्ट्या नुकसान होत असून, अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निष्कासित करण्याकरीता विलंब होण्याची कारणे काय आहेत, तसेच यासंदर्भात शासन किती कालावधीत सदरील कारवाई पूर्ण करणार आहे,
(३) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात राहणाऱ्या रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३०५/१९९५ मध्ये दिनांक ०७/०५/१९९७ रोजी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनक्षेत्रावरील अतिक्रमण हटविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील एकूण ११,३५९ अतिक्रमकांचे उद्यानक्षेत्राबाहेर पुनर्वसन करण्यात आले आहे.

दूसऱ्या टप्प्यातील १३४८६ अतिक्रमकांच्या चांदिवली येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाव्दारे नियुक्त विकासकाव्दारे पुनर्वसनाकरीता उभारण्यात येणाऱ्या इमारती मुंबई विमानतळाच्या एअर फनेल झोन मध्ये येत असल्याबाबत भारतीय विमानतळ प्राधिकरणाने आक्षेप घेतल्यामुळे सदर इमारतींचे बांधकाम बंद अवस्थेत आहे. तद्‌नंतर भारतीय विमानतळ प्राधिकरणाद्वारे सदर इमारतींची उंची आवश्यकतेनुसार ६ ते ११ मजल्यांपर्यंत मर्यादीत करण्यात आली. तथापि, अद्यापही विकासकामार्फत कोणतीही सदनिका हस्तांतरीत करण्यात आलेली नाही.

तद्‌नंतर पुनर्वसन प्रकल्प राबविण्याकरीता म्हाडाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या मौजे मरोळ-मरोशी येथील ९० एकर क्षेत्रात इमारती उभारण्याकरीता म्हाडाव्दारे काढण्यात आलेल्या निविदेस प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली आहे. यास्तव दुसऱ्या टप्प्यातील पुनर्वसनाची प्रक्रीया खोळंबली आहे.

उपरोक्त पूनर्वसनासंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र. ४८/२०२३ दाखल करण्यात आली होती. दरम्यानच्या काळत राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात नवीन प्रकल्पास मनाई करण्यात आली आहे. जनहित याचिका क्र. ४८/२०२३ मध्ये दिनांक १४/०१/२०२४ रोजी

पारीत केलेल्या आदेशांन्वये वेळोवेळी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेण्यात येऊन पुनर्वसनासाठी पर्यायी जागा शोधणे, अतिक्रमणाचे सर्वेक्षण करण्यासाठी सल्लागार/ सर्वेक्षण संस्थेची नियुक्ती करणे, संरक्षक भिंत उभारण्याकरीता अंदाजपत्रके तयार करुन निधी उपलब्ध करुन घेणे, इत्यादी बाबींची पुर्तता करण्यास संबंधित शासकीय विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार अतिक्रमणाचे सर्वेक्षण करण्यासाठी सल्लागार/ सर्वेक्षण संस्थेची नियुक्ती करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्याना सभोवताली संरक्षक भिंत उभारणीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील एकूण २७ व्यावसायीक अतिक्रमणे निष्कासीत करण्यात आली असून उर्वरित अतिक्रमणे निष्कासीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जात प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबत

**(१८) * ४३६ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात बनावट जात प्रमाणपत्र धारकांमुळे अनुसूचित जमातींतील विद्यार्थ्यांच्या संधी हिरावल्या जात असून अन्य जाती आरक्षणाचा लाभ गैरमार्गाने मिळवित असल्याने राज्यातील जात प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता असून खोटे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही सक्त कारवाई व्हायला हवी, असे निर्देश राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने राज्य शासनाला दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात बनावट दाखले देणाऱ्यांविरुध्द तसेच जात प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी व खोटे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक वुईके :** (१) दिनांक १०/०१/२०२५ रोजीच्या महाराष्ट्र टाइम्स या दैनिक वृत्तपत्रामध्ये “खोटे प्रमाणपत्र, कारवाईची मागणी” या मथळयाखाली राज्यात खोट्या जात प्रमाणपत्रधारकांनी अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांच्या संधी हिरावल्या असून अन्य जाती आरक्षणाचा लाभ गैरमार्गाने मिळवत आहे. राज्यातील जात प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या प्रकीयेत सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता असून खोटे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही सक्त कारवाई व्हायला हवी असे सक्त निर्देश राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने राज्य सरकारला दिले.” अशी बातमी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) मा.राष्ट्रपती यांच्या मान्यतेने "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३)" व महाराष्ट्र शासनाने सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ पारीत केले आहेत.

सदर अधिनियम, २००० मधील कलम १३(१) या अधिनियमान्वये, सक्षम प्राधिकाऱ्याची कामे पार पाडणारी जी कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकारी, हेतुपुरस्सर जातीचे खोटे प्रमाणपत्र देईल त्या व्यक्तीस अपराधसिध्दीनंतर सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षापर्यंत असु शकेल इतक्या सश्रम कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील अशी तरतूद आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जातीचे/ जमातीचे प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सूचविण्यासाठी शासन निर्णय दिनांक १४/०१/२०१९ अन्वये श्री.पी.व्ही.हरदास, सेवानिवृत्त न्यायाधीश, मा.मुंबई उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने त्यांच्या दिनांक २०/०५/२०१९ रोजीच्या शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये, "मा.सर्वोच्च न्यायालयाने कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर या प्रकरणी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सध्या अस्तीत्वात असलेली कार्यपध्दती व यंत्रणा यामध्ये कोणताही व्यत्यय आणण्याची वा पर्यायी यंत्रणा सूचविण्याची आवश्यकता नसल्याचे" स्पष्ट केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरिवली (मुंबई) येथील खाजगी जागेवरील झोपडपट्टीधारकांना वन विभागाने नोटीस बजाविल्याबाबत

**(१९)** * **८०२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली, मुंबई येथील वन जमीन सर्व्हे क्रमांक ३४/ब (मागाठाणे) च्या शेजारी असलेल्या खाजगी जागेतील पांडे कंपाऊंड (पोईसर) झोपडपट्टीत राहणारे रहिवासी शासनाकडे नॉन-ॲग्रीकल्चर असेसमेंट टॅक्सचा (NA Tax) नियमितपणे भरणा करीत असून देखील त्यापैकी काही ठराविक झोपडीधारकांना वनपरिक्षेत्र अधिकारी, कृष्णगिरी उपवन कार्यालय, बोरिवली यांनी वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे कारण दर्शविणारे सूचना पत्र पाठविल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी अतिक्रमणाची नोटीस पाठविताना वनविभागाने जी प्रक्रिया व निकष अवलंबिले आहेत, त्याचा तपशील काय आहे व या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या झोपडीधारकांपैकी काही ठराविक झोपडीधारकांना अतिक्रमणाची नोटीस पाठविण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी ठराविक झोपडीधारकांना हेतू:पुरस्सरपणे अतिक्रमणाची नोटीस पाठविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच वनविभागाने त्यांच्या जमिनीची चतुर्सिमा निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३०५/१९९५ मध्ये दिनांक ०७/०५/१९९७ रोजी पारित केलेले आदेशानुसार पात्र अतिक्रमकांचे वनक्षेत्राबाहेर पुनर्वसन करुन वन जमिनीवरील अपात्र अतिक्रमण निष्कासीत करणे. तसेच जनहित याचिका क्रमांक ४८/२०२३ मध्ये पारित आदेशान्वये पात्र व अपात्र अतिक्रमण धारकांची यादी तयार करणेकामी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली मधील मागाठाणे सर्वे नं. ३४/ब अवर्गीकृत वनातील अतिक्रमणधारकांना पुरावे सादर करण्याकरीता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रशासनामार्फत सुचनापत्र जारी करण्यात आले आहे. तथापि, या व्यतिरीक्त इतर कोणत्याही खाजगी जागेवरील इसमांना पुरावे सादर करण्याबाबतचे सुचनापत्र देण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरालेपाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) आदिवासी पाड्यातील रहिवाशांना मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(२०) * १०१ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरालेपाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) या आदिवासी पाड्यातील विद्यार्थ्यांना सावरदेव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत जाण्यासाठी वाहतुकीची कोणतीही साधने उपलब्ध नसल्याने तानसा तलावातील उथळ पाण्यातून प्लॅस्टीकच्या पाईपपासून बनविलेल्या तराफ्यातून प्रवास करावा लागत असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तानसा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात वसलेले अनेक आदिवासी पाडे वाहतुकीची साधनांपासून तसेच दळणवळण, शिक्षण, पाणी आणि वीज या मूलभूत सुविधांपासून आजही वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदिवासी पाड्यातील रहिवाशांना वाहतुकीची साधने तसेच शिक्षण, पाणी आणि वीज इत्यादी मूलभूत सुविधा पुरविण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक वुईके :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत मौजे बोरालेपाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) आदिवासी पाड्यातील विद्यार्थ्यांना सावरदेव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत जाण्यासाठी बोट उपलब्ध आहे.
(२) व (३) तानसा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात बोरालेपाडा, चराचापाडा, पेंढरीपाडा, कोंबपाडा, भांगरेपाडा, चक्कीचापाडा, राजपुरी, पारेलापाडा व रावतेपाडा पाडे अस्तित्वात आहेत.

उपरोक्त सर्व पाड्यामध्ये वीजपुरवठा व पाण्याची सोय उपलब्ध आहे. तसेच, कोंबपाडा, भांगरेपाडा, राजपुरी व रावतेपाडा या चार पाड्यांव्यतीरिक्त उर्वरित पाड्यांमध्ये अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळा आहेत.

सर्व पाडे हे गाडी वाटेने (Cart Track) ने जोडलेले आहेत. सदरील पाडे हे खर्डी वन्यजीव अभयारण्य क्षेत्रात असून खर्डी वनविभाग, ता.शहापूर, जि.ठाणे अंतर्गत येतात.

उपवनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे यांनी त्यांच्या दिनांक १५/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त पाड्यांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तसेच अन्य अशा एकूण १५ साकव बांधकामाचा रुपये १५२.८० लक्ष रकमेचा एकत्रित प्रस्ताव बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून तांत्रिक मान्यता घेऊन जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती, ठाणे यांना प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रोजगार हमी योजनांच्या कामांना प्रोत्साहन देण्याबाबत

**(२१) * ९४५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३४ जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या ५ लाख ९९ हजार २९५ कामातून फक्त ७९ हजार ७२१ कामे पूर्ण झाली असून ८६.७% कामे प्रलंबित असल्याचे तसेच वाशिम जिल्ह्यात मंजूरी देण्यात आलेल्या १६ हजार ३६९ कामांपैकी केवळ ८१५ कामे पूर्ण झाल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहयोतून होणाऱ्या कामांमध्ये येणाऱ्या विविध अडचणीमुळे योजनेला चालना मिळत नसल्याने ग्रामीण भागात रोजगार निर्मितीबरोबर विकासाला गती देण्याचे योजनेचे उद्दिष्ट साध्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच प्रलंबित कामे पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५५८१९५ कामे मंजूर असून १०२३६७ कामे पूर्ण झाली आहेत. मंजूर कामांपैकी ४५५८२८ कामे सुरू आहेत. तसेच वाशिम जिल्ह्यात आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये एकूण १९९३८ कामांपैकी ८७७ कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे सुरु आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) मगांराग्रारोहयोजनेच्या कामांतून होणाऱ्या विविध लाभांबाबत, विविध माध्यमांद्वारे योजनेची प्रचार/ प्रसिध्दी केली जाते. प्रलंबित कामे पूर्ण होण्यासाठी जिल्हा स्तरावर विविध माध्यमांद्वारे पाठपुरावा सुरू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे अनुदान मिळण्याबाबत

**(२२)** * **६४० श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांचे सन २०२३ मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे अनुदान अनेक तांत्रिक अडचणीमुळे अद्यापही शेतकऱ्यांना मिळाले नसून सन २०२४ मध्ये अतिवृष्टी अनुदानाचा निधी मंजूर होऊनही कृषी व महसूल यंत्रणेच्या ढिसाळ कारभारामुळे आजपर्यंत याद्या पूर्ण झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीच्या अनुदानासोबतच पीएम किसान सन्मान योजनेतील त्रुटी दूर करुन सन २०२३ मधील पिकविम्याचे पैसे शेतकऱ्यांना लवकर अदा करण्याच्यादृष्टीने संबंधित विमा कंपनीला आदेश देण्याबाबत तसेच विविध मागण्यांसंदर्भात शेतकऱ्यांनी तहसिलदार, देगलूर यांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या उपरोक्त मागण्या मान्य करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव-पाटील :** (१) सन २०२३ मध्ये ४६,०१३ शेतकऱ्यांना रुपये ४२.२३ कोटी इतके अतिवृष्टीचे अनुदान डि.बी.टी. पध्दतीने बँक खात्यावर जमा करण्यात आले आहे. तसेच सन २०२४ मध्ये ३४,९८६ शेतकरी यांना रुपये ३३.७५ कोटी इतके अतिवृष्टीचे अनुदान डि.बी.टी. प्रणालीद्वारे बँक खात्यावर जमा करण्यात आले आहे. उर्वरित शेतकरी यांची माहिती डि.बी.टी. प्रणालीवर भरण्याची कार्यवाही सुरु असून E-KYC झालेल्या शेतकऱ्यांना डी.बी.टी. प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील वन विभागाच्या जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमणे व उत्खनन करण्यात येत असल्याबाबत

**(२३)** * **६४३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वन विभागाच्या ताब्यात असलेल्या वन क्षेत्राच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असून सदर जमिनीवर बेकायदेशीररित्या उत्खनन करणे, साग व खैराच्या लाकडांची तस्करी करणे, वन विभागाच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या बेकायदा चाळींना संरक्षण देणे इ. गैरप्रकार सुरु असून वनखात्यातील अधिकारी/ कर्मचारी हे सदर बेकायदा कृत्यांना अभय देत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पालघर जिल्ह्यातील वन विभागांतर्गत क्षेत्रातील बेकायदेशीर कृत्यांना त्वरित आळा घालण्याकरीता कोणती कार्यवाही केली तसेच अतिक्रमण करून बेकायदा कृत्य करणाऱ्यांवर व संबंधितांना मदत करणाऱ्या दोषी अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील सर्व्हे क्र. ३७१ (नवीन सर्व्हे क्र. १४१) येथील जमीन विषयक गैरव्यवहाराबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांनी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये तत्का. वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. प्रस्तूत प्रकरणी श्री.चौरे, तत्का. वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांच्यावर विभागाद्वारे दिनांक ०६/०२/२०२५ च्या शासन आदेशान्वये निलंबनाची कारवाई करुन विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यातील मांडवी वनपरिक्षेत्रात नागरी वस्तीला लागून असलेल्या वाटप परंतु निर्वनीकरण न झालेल्या क्षेत्रात अनधिकृत अतिक्रमणाची समस्या तसेच विविध ठिकाणी लाकडाची तस्करी, उत्खनन अशा बाबी निदर्शनास येत आहेत.

त्यावर आळा घालण्यासाठी संवेदनशील क्षेत्राचे सर्वेक्षण व सिमांकन करणे, नियमित रात्र गस्त, वनोपज तपासणी नाका बळकटीकरण इ. उपाययोजना करण्यात येत असून अन्य विभागांच्या सहयोगाने अतिक्रमण निर्मुलनाची कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वन्य प्राण्यांकडून शेत पिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(२४) * ४९६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमधील एकूण १८३ गावांमध्ये तसेच पिंपळदरी (ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर) गावामध्ये व मंठा (जि.जालना) तालुक्यात वन्यप्राण्यांकडून शेतीचे नुकसान व जीवित हानी तसेच मंठा (जि.जालना) शहरात वानरांचा उपद्रव वाढून नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे स्थानिक नागरिक व शेतकरी त्रस्त असून नुकसानभरपाई देणे, वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करणे आणि शेतकऱ्यांना संरक्षणासाठी शेत कुंपणासाठी अनुदान देण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील वन्यप्राण्यांचा उपद्रव रोखून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रामध्ये माहे जानेवारी, २०२५ मध्ये वन्यप्राण्यांमुळे मनुष्य हानी/ जखमीच्या २ घटना, पशुधन नुकसानीच्या ४ घटना व शेतपीक नुकसानीच्या ८६ घटना निदर्शनास आल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर वनवृत्तातील मौजे पिंपळदरी, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर व मौजे मंठा, जि.जालना येथे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वन्यप्राण्यांनी नुकसान केल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

महाराष्ट्र वन्य प्राण्यामुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ या कायद्यातील तरतुदीनुसार मृतांच्या कायदेशीर वारसास व नुकसानग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्याकरीता अर्थसंकल्प निधी वितरण प्रणालीवर २४०६ २३६६ या लेखाशिर्षांतर्गत उणे (-) प्राअधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर वनवृत्तातील ५ गावांमध्ये एकूण १४९ वानरांना जेरबंद करुन त्यांचे नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले आहे.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजनेंतर्गत संरक्षित क्षेत्रा लगतच्या शेतीला व्यक्तीगत स्वरुपात सौर ऊर्जा कुंपणाचा लाभ देण्याची बाब समाविष्ठ करण्यात आली आली आहे.

मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्राण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असून त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, निर्धुर चुली, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर जिल्ह्यात समाजकल्याण विभागाने अवैधरित्या अभ्यासिकेच्या इमारतीचे बांधकाम सुरू केल्याबाबत

**(२५) * ११०६ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील समाजकल्याण विभागाला इमारत बांधकाम करण्याचे अधिकार तसेच निविदा काढण्याचे अधिकार नसतानाही नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत थेट अभ्यासिकेच्या इमारतीचे बांधकाम सुरू केले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार वर्षांपूर्वी सुरू झालेले बांधकाम कायद्याच्या विविध प्रक्रियेत अडकल्याने अभ्यासिकेच्या इमारतीचे काम अद्याप पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी रुपये ५ कोटींपेक्षा अधिक रकमेची निविदा काढली होती, इतक्या मोठ्या निधीचे काम करण्यासाठी शासनाची मान्यता आवश्यक असतानाही याप्रकरणी शासनाची मान्यता घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीतही हा प्रस्ताव मान्यतेसाठी मांडण्यात आला नव्हता, त्याचप्रमाणे बांधकाम सुरू करण्याआधी महापालिकेकडून परवानगी घेतली गेली नसल्याने, त्याचा एसएफआयचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अवैधरित्या अभ्यासिकेच्या इमारतीचे बांधकाम केल्याप्रकरणी संबंधित दोषी अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) व (२) हे खरे नाही.

सदरचे काम कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत करण्यात येत असून सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी बांधकामासाठीच्या सर्व स्थानिक प्राधिकरणाकडून ना-हरकत प्रमाणपत्रे व परवानग्या घेतलेल्या आहेत. सदरचे काम हे अंतिम टप्प्यात असून दिनांक ३१/०६/२०२५ अखेर इमारत समाजकल्याण विभागास हस्तांतरित करण्याचे नियोजित आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून हे काम करण्यात येत असून या कामाच्या निविदेबाबत १ कोटीपर्यंतचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना असून १५ कोटीपर्यंतचे अधिकार मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांना आहेत. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी कार्यवाही केलेली आहे. तसेच या कामाबाबतचा ठराव जिल्हानियोजन समितीच्या बैठकीत मांडला असून त्याला पालकमंत्री यांनी मान्यता दिलेली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात पीक संजीवक कंपन्यांद्वारे शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(२६) * ११६४ श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात कृषी विभागांतर्गत औषधाच्या गुणनियंत्रणाची जबाबदारी असताना विभागातील सेवानिवृत्त अधिकारी तसेच सध्या कार्यरत असलेले अधिकारी यांनी स्वत:च्या नातेवाईक तसेच कुटूंबांच्या नावांवर अनेक पीजीआर (पीक संजीवक) कंपन्या स्थापन करून अमाप नफा कमवित असल्याची बाब दिनांक १७ जानेवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पीजीआर कंपन्यावर केंद्र व राज्य शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने अधिकारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी यांनी स्थापन केलेल्या पीजीआर कंपन्याचा माल शेतकऱ्यांना दुकानदाराकडून घ्यावा लागत असल्याने शेतकऱ्यांची लूट सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संदर्भात दोषी आढळलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसह कार्यरत अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेटवे ऑफ इंडिया येथील जेट्टीवरील हायस्पीड वॉटर टॅक्सीचालकांकडून बेकायदेशीररित्या पैसे वसुली केली जात असल्याबाबत

**(२७) * १२१४ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेट वे ऑफ इंडियाच्या जेट्टी क्रमांक पाच वरुन घारापुरी आणि मांडव्याला जाणाऱ्या हायस्पीड वॉटर टॅक्सीचालकांकडून सागरी महामंडळाचे अधिकारी बेकायदेशीररित्या पैसे वसूल करीत असून सदर प्रवाशांसाठी तिकीट दर निश्चित केले नसल्यामुळे टॅक्सीचालकही प्रवाशांकडून अवाजवी शुल्क आकारत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील गेटवे ऑफ इंडियावरुन एलिफंटाला जाणाऱ्या फेरीबोटीला मागील काही दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात पुरेशा सुरक्षेअभावी जवळपास १५ प्रवाशांचा मृत्यू झाल्यामुळे प्रशासनाने फेरीबोटी व वॉटर टॅक्सीमध्ये लाईफ जॅकेट वापरणे अनिवार्य केले असून निर्णयाची अंमलबजावणीसाठी गेटवे ऑफ इंडियावर अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जेट्टी नंबर ५ वरुन हार्बर क्षेत्रात बेकायदेशीर प्रवासी वाहतूक सुरू असून या बोटीमध्ये लाईफ जॅकेट वा सुरक्षेची इतर कोणतीही साधने नसूनही त्यांवर संबंधित अधिकारी कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हायस्पीड वॉटर टॅक्सी वाहतुकीचे नियमन करण्याकरीता, प्रवाशांचे तिकीट दर निश्चित करण्याकरीता व प्रवाशांच्या सुरक्षेकरीता कोणती कार्यवाही केली तसेच बेकायदेशीररित्या वसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) नाही.

तथापि, गेटवे ऑफ इंडिया येथील पाच नंबर जेट्टीवरील वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने मांडवा ते गेट वे ऑफ इंडिया दरम्यान स्पीड बोट चालविण्यासाठी इच्छुक मालकांनी महाराष्ट्र सागरी मंडळाकडे सादर केलेल्या ४९ प्रस्तावांना, मांडवा ते गेट वे ऑफ इंडिया, बेलापूर आणि एलिफंटा या जलमार्गासाठी तात्पुरत्या स्वरुपात Pilot Basis वर दिनांक २५/०५/२०२५ पर्यंत प्रति महिना प्रति स्पीडबोटीसाठी रक्कम रुपये ४९९९/- जीएसटी सहित किंवा माहे डिसेंबर, २०२४ ते मे, २०२५ या कालावधीकरीता रक्कम रुपये ३०,०००/- जीएसटी सहित इतके मांडवा जेट्टीकडून परवानगीकरीताचे प्रवासी शुल्क महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार जलमार्गासाठी परवानगी (Route Permission) देण्यात आलेली आहे. सदर ४९ स्पीड बोटींकडून रुपये ६,५९,९२२/- (जीएसटीसहित) इतकी महसूल शुल्क स्पीड बोट मालकाकडून प्रादेशिक बंदर अधिकारी, मोरा यांचेकडे भरणा केलेले आहे.

(२) व (३) महाराष्ट्र सागरी मंडळमार्फत परिपत्रकाद्वारे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या अनुषंगाने सर्व बोट ऑपरेटर यांना सक्त सूचना दिलेल्या आहेत. गेटवे ऑफ इंडिया येथील प्रत्येक जेट्टीवर महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे जवान तैनात करण्यात आलेले असून त्यांच्याकडून प्रवासी बोटीत प्रवासी क्षमतेइतकी प्रवासी वाहतूक होत असल्याची खात्री केली जात आहे. तसेच बोटीत बसण्याआधी प्रत्येक प्रवाशाला लाईफ जॅकेट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(४) व (५) गेट वे ऑफ इंडिया हे मुंबई बंदर प्राधिकरण यांच्या अखत्यारीत येते. गेट वे ऑफ इंडिया येथून मांडवा व घारापुरी येथे जाणाऱ्या प्रवासी बोटींचे तिकीट दर हे मुंबई बंदर प्राधिकरण यांच्याकडून निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे गेट वे ऑफ इंडिया येथील जेट्टी क्र. ०५ येथून होणाऱ्या हायस्पीड वॉटर टॅक्सी सेवेकरीता तिकीट दर ठरविण्याच्या कार्यवाहीबाबत मुंबई बंदर प्राधिकरण यांना महाराष्ट्र सागरी मंडळाच्या स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

-----------------

## गुंठेवारी खरेदी-विक्री व्यवहारातील शुल्क व अडचणीबाबत

**(२८) * १२२९ श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्य शासनाने गुंठेवारी क्षेत्रात किमान दहा आर गुंठे क्षेत्र खरेदी विक्रीस मान्यता दिल्याने जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार सुरू झाले असून यात जमीन किंमतीच्या पाच टक्के खरेदी शुल्क आधीच भरावे लागत असल्याने गट फाळणी आणि मोजणीसाठी अवाजवी शुल्क भरावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तविक गुंठेवारी कायद्यात शिथिलता आणल्यानंतर खरेदी-विक्री होत असतानाच त्याचे सातबारा देखील वेगळे होतात परंतु एकाच गटातील तुकडा हिस्सा घेतल्याने नकाशावर मोजणी खर्चिक होत असल्याने शासनाने जमीन मालकांना दिलासा देण्याची मागणी शिराळा व वाळवा तालुक्यातील (जि.सांगली) शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूमि अभिलेख विभागाने संबंधित कार्यक्षेत्रात झालेल्या खरेदी विक्री द्वारे तयार झालेल्या सातबारा उताऱ्यांवरून जमीन मोजणी करून नकाशा तयार करण्याची मोहीम राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) शासन अधिसूचना दिनांक ०१/०१/२०२५ अन्वये महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत आणि त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ च्या तरतुदींच्या विरुध्द दिनांक १५/१०/२०२४ पर्यंत केलेले कोणत्याही जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजन हे अशा जमिनीच्या बाजारमुल्याच्या २५ टक्के ऐवजी ५ टक्के आकारुन नियमाधीन करण्यात येतील अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हिस्से नियमानुकुल करणेची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांचे स्तरावरुन करणेत येते.

वरीलप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे तुकडे नियमित करताना करावयाची मोजणी ही पोट हिस्सा मोजणीप्रमाणे करण्यात येते. त्यामध्ये धारण जमिनीच्या ७/१२ या अधिकार अभिलेखातील संबंधित तुकड्याची मोजणी करताना संबंधित अर्जदाराची सदर तुकडा असलेल्या गट नंबर मधील त्यांचे हिश्श्याचे नेमके क्षेत्र व हद्द निश्चित करणेसाठी संबंधित गट नंबरमधील सर्व सह पोट हिस्सा धारकांची मोजणी करणे आवश्यक असल्यामुळे संपूर्ण गट नंबरची मोजणी फी नियमानुसार भरणे आवश्यक आहे.

डिजीटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमातंर्गत राज्यातील पोटहिस्सा मोजणी व नकाशा अद्यावतीकरण करणेसाठी राज्यातील ६ महसूली विभागातील प्रत्येकी २ असे एकूण १२ तालुक्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुंगारेश्वर वन्यजीव (ता.वसई, जि.पालघर) अभयारण्यामधील रिटेनिंग वॉलच्या कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२९)** * **१२९९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुंगारेश्वर (उत्तर), तुंगारेश्वर वन्यजीव (ता.वसई, जि.पालघर) अभयारण्यामध्ये जिल्हा नियोजन समिती, पालघर व शासनाच्यावतीने नाला बांधकाम तसेच रिटेनिंग वॉल इ. चे बांधकाम करताना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदारांशी आर्थिक संगनमताने अनेक कामे कागदोपत्री दाखवून कंत्राटदारांना देयके अदा केल्याने मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अनेक सामाजिक संस्था व स्थानिक नागरिकांनी तसेच मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी वनरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना पत्राद्वारे निवेदन देऊनही सदरहू प्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करुन तद् नुषंगाने सदरहू अनियमिततेप्रकरणी कंत्राटदारास काळ्या यादीत टाकून दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०२३-२४ करीता जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यामधील तुंगारेश्वर (उत्तर) येथे करण्यात आलेल्या नाला बांधकाम (गॅबियन बंधारे) तसेच रिटेनिंग वॉल इ. कामांपैकी १०% कामांची सहाय्यक वनसंरक्षक (येऊर) यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय समितीने पाहणी केली असता कामांमध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील स्वयंचलित हवामान यंत्रे चुकीच्या पध्दतीने नोंद घेत असल्याबाबत

**(३०) * ४५६ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात पिकांच्या नुकसानीच्या नोंदी घेण्यासाठी स्वयंचलित हवामान यंत्रे प्रत्येक महसूल मंडळात बसविण्यात आलेली असून, सदर यंत्रांची अनेक वर्षांपासून देखभाल व दुरुस्ती करण्यात आली नसल्यामुळे सदर यंत्रे चुकीच्या पध्दतीने नोंद घेत असल्याने शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही त्यांना विमा कंपनीकडून पीक विमा नाकारला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील महसूल मंडळांमधील स्वयंचलित हवामान यंत्रे दुरुस्त करुन त्याची देखभालीकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

कृषी व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.राकृवि.०६१६/ प्र.क्र.७४/राकृवियो कक्ष दिनांक ०८ मार्च, २०१७ अन्वये राज्यात महावेध प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. महावेध प्रकल्पांतर्गत नांदेड जिल्ह्यात अनुक्रमे ८९ स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापित केली आहेत. सदर सर्व स्वयंचलित हवामान केंद्र सद्य:स्थितीत चांगल्या प्रकारे देखभाल केलेली आहेत आणि कार्यरत स्थितीत आहेत.

शासन नियुक्त तांत्रिक सल्लागारांद्वारे यादृच्छिक पध्दतीने विविध हवामान केंद्रांची तपासणी करण्यात येते. तसेच क्षेत्रिय स्तरावरील स्थानिक सरकारी अधिकारी वारंवार हवामान केंद्रांची तपासणी आणि ऑडिट करतेवेळी उपस्थित राहतात.

पुनर्रचित हवामान आधारीत फळपीक विमा योजनेंतर्गत सद्य:स्थितीत मृग बहार २०२४ मधील विमा नुकसान भरपाई परीगणना विमा कंपनी स्तरावर सुरु आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे धनसार (ता.जि.पालघर) ग्रामपंचायत क्षेत्रातील शासकीय जमिनीवर विकासकाने अतिक्रमण केल्याबाबत

**(३१) * ७० श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धनसार (ता.जि.पालघर) ग्रामपंचायत क्षेत्रातील गट क्र. १९३ मधील सात ते आठ एकर शासकीय जमीन ही गावाच्या मैदानासाठी वापरात असून, सदर जागेच्या काही भागात विकासकाने अतिक्रमण करुन इमारतीचे बांधकाम केले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय जमिनीवरील मैदानावर बांधकामाची परवानगी कोणी दिली तसेच मैदानाच्या चारही बाजूस कुंपण करण्यासाठी तीस लाख रुपये ग्रामपंचायतीला दिले असताना केवळ तीन बाजूने कुंपण केले असून विकासकाने अतिक्रमण केलेल्या जमिनीच्या बाजूने कुंपण खुले सोडण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी अतिक्रमण करणाऱ्या विकासकाविरुध्द कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक प्रशासनाकडे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली तसेच सदर मैदानावरील अतिक्रमण निष्कासित करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) तथापि, प्रस्तुत प्रकरणी श्री.कुंदन शंकर राऊत व इतर ग्रामस्थ यांनी गट नं.१९३/३ मधील ०.६०.०० हे.आर जमिनीवर दिनांक ०३/०६/२०२२ रोजी दिलेली बांधकाम परवानगी रद्द करणेबाबत जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयाकडे तक्रार/ हरकत अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी संबंधितांची सुनावणी घेऊन दिनांक २०/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढला आहे.
(४) मौजे धनसार, ता.जि.पालघर येथील गट नं.१९३/३ क्षेत्र ०.६०.०० हे. आर जमिनीबाबत उप अधीक्षक, भूमी अभिलेख पालघर यांच्या दिनांक १९/०७/२०१६ रोजीच्या मोजणी नकाशाप्रमाणे जमिनमालक व विकासक यांना जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांच्याकडून बांधकाम परवानगी देण्यात आलेली असून, विकासक यांनी त्यांच्या हद्दीमध्ये बांधकाम परवानगीनुसार बांधकाम चालू केलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निफाड (जि.नाशिक) येथे ड्रायपोर्ट उभारण्यासाठी करावयाच्या भूसंपादनाबाबत

**(३२) * १३९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) येथे ड्रायपोर्ट उभारण्याकरीता जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाला जोडणाऱ्या ८ किलोमीटर रेल्वे मार्गासाठी ११ एकर जमिनीचे संपादन सक्तीने करण्याचे महसूल विभागाने निदेश दिले असून संपादनास शेतकऱ्यांची संमती नसल्याने सदर प्रकल्प मागील ५ वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ड्रायपोर्ट उभारण्याकरीता सक्तीने भूसंपादन केल्यास शेतकऱ्यांवर अन्याय होणार असल्याने यामध्ये पर्यायी मार्ग काढण्याची मागणी संबंधित भागातील शेतकऱ्यांनी शासनाकडे वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

निफाड (जि.नाशिक) येथे ड्रायपोर्ट करीता जवाहरलाल नेहरु पत्तन प्राधिकरण, मुंबई यांचा खाजगी वाटाघाटीने सरळ खरेदीबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांचेकडे दिनांक ०८/११/२०२३ रोजी प्राप्त झाला होता. तथापि, संबंधित भूधारकांनी थेट खरेदी अमान्य केली असल्याने भूसंपादन संस्थेच्या विनंतीनुसार "भूमि संपादन, पुनर्वसन व पुनःर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम २०१३" अन्वये सक्तीने भुसंपादन करण्यात येत आहे.

(२) व (३) सदर भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, निफाड यांना दिनांक ०४/०९/२०२४ रोजी निवेदन सादर करुन मौजे. पिंपळस (रामाचे) ता.निफाड, जि.नाशिक येथील मिळकतींना मौजे कसबे सुकेणे बारामाही बागायत प्रमाणे ९०-१००% मोबदला मिळणेबाबत मागणी केली. मात्र सदर मागणी मान्य करणे शक्य नसल्याने ड्रायपोर्ट करीता भूसंपादन अधिनियम, २०१३ अन्वये, सक्तीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव जवाहरलाल नेहरु पत्तन प्राधिकरण, मुंबई यांनी दिनांक १४/११/२०२४ रोजी सादर केला आहे.

संबंधित भूधारकांनी थेट खरेदी अमान्य केली असल्याने भूसंपादन संस्थेच्या विनंतीनुसार "भूमि संपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम २०१३" अन्वये सक्तीने भुसंपादन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात रासायनिक खतांची दरवाढ कमी करण्याबाबत

**(३३)** * **२९० श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.सचिन अहिर, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रासायनिक खतांच्या किंमतीमध्ये प्रती बॅग २४० ते २५५ रुपयांनी वाढ करण्यात आली असताना येणाऱ्या हंगामात रासायनिक खतांच्या किंमतीत पुन्हा वाढ करण्यात येणार असल्याबाबत खत विक्रेत्यांना लेखी स्वरुपात सूचना दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसताना दिवसेंदिवस बी-बियाणे व खतांच्या वाढत्या किंमतीमुळे शेतीच्या खर्चात वाढ होणार असून बियाणे व खतांच्या वाढत असलेल्या किंमती कमी करण्याबाबत शेतकऱ्यांमार्फत शासनाकडे निवेदन देऊनही शासनाने किंमती कमी केल्या नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने रासायनिक खतांच्या किंमतीत होणारी वाढ कमी करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) N:P:K १०:२६:२६ व N:P:K १२: ३२:१६ या खतांच्या किंमतीमध्ये माहे जानेवारी, २०२५ पासून २५५ रुपये पर्यंत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. आगामी हंगामात खतांच्या किंमती पुन्हा वाढणार असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) अनुदानित खतांच्या किंमती कमी व्हाव्यात यासाठी खतांच्या किंमतीवरील GST माफ करण्याबाबत केंद्र शासनास विनंती दिनांक ११/०२/२०२५ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे.
(४) लागू नाही.

-----------------

## खोडाळा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील मंडळ कृषी कार्यालयाच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(३४) * ३१३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोडाळा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील मंडळ कृषी कार्यालयाची इमारत गेल्या ५० वर्षात दुरुस्तीअभावी धोकादायक झाली असून, इमारतीमध्ये शेतीविषयक कामाकरीता येणारे नागरिक तसेच कार्यालयात कार्यरत असलेले अधिकारी/ कर्मचारी आपला जीव धोक्यात घालून इमारतीमध्ये वावरत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त संभाव्य जीवित व वित्त हानी टाळण्याच्यादृष्टीने तसेच मंडळ कृषी कार्यालयाच्या इमारतीची लवकरात लवकर दुरुस्ती करून नवीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.
(२) मंडळ कृषी अधिकारी, खोडाळा कार्यालयाची इमारत ग्रामपंचायत खोडाळा यांचे मालकीचे जागेवर असल्याने, त्यावर दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम प्रस्तावित करण्यात आलेले नाही. खोडाळा गावात कृषी विभागाच्या नावावर कोणतीही जागा उपलब्ध नाही.

सदरची इमारत खूपच जुनी असल्याकारणाने, मंडळ कृषी अधिकारी, खोडाळा कार्यालय हे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मोखाडा यांचे मालकीचे मौजे खोडाळा येथील इमारतीमध्ये दिनांक १५/१२/२०१९ रोजी पासून भाडेतत्वावर स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील कुरुम मंडळातील शेतकरी सोयाबीन पिकविमा लाभापासून वंचित असल्याबाबत

**(३५) * ४३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाने सन २०२३-२०२४ मध्ये खरिप हंगामातील सोयाबीन पिकाची नुकसान भरपाई म्हणून पिकविमा रकमेचा हप्ता दिला असून विमा कंपन्यांनी मात्र तालुक्यातील कुरुम मंडळातील ५४३ शेतकऱ्यांना सोयाबीन पिकविमा लाभापासून वंचित ठेवले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा कंपन्यांचे अधिकारी/ कर्मचारी यांनी शेतकऱ्यांची दिशाभूल करुन पिकविमाच्या नावे पैसे घेऊन फसवणूक केली असल्याबाबतचे निवेदन शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांची दिशाभूल करुन पिकविमासाठी नावे पैसे घेऊन फसवणूक करणाऱ्या विमा कंपन्यांच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच कुरुम मंडळातील ५४३ शेतकऱ्यांना पिकविमा रकमेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

(२) सदरहू निवेदन कृषी विभागास प्राप्त झालेले नाही.

(३) कुरुम मंडळातील शेतकऱ्यांच्या तक्रारीसंदर्भात सोयाबीन पिकांसाठी विमा घेतलेल्या ३२१९ शेतकऱ्यांपैकी ३२१७ शेतकऱ्यांना रुपये ४ कोटी ३७ हजार इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून वाटप करण्यात आली आहे. उर्वरीत २ शेतकऱ्यांची नुकसान भरपाई रुपये १०००/- चे आत असल्याने सदर नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खत विक्रीतील लिंकिंग सक्तीमुळे शेतकरी आणि विक्रेत्यांच्या अडचणींबाबत

**(३६) * ३८३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी खताच्या लिंकिंगमुळे त्रस्त झाला असून लिंकिंग घेतले तरच खतांचा पुरवठा करू अशी सक्ती खत कंपन्या विक्रेत्यांना करीत असून, लिंकिंग करून खतांची विक्री केली तर कृषी विभाग सदर विक्रेत्यांवर कारवाई करीत असल्याने विक्रेत्यांची कोंडी होत असल्याचे तसेच शेतकऱ्यांना युरिया खताच्या ४० किलोच्या २६५ रुपयांच्या पोत्यासोबत १५० ते २०० रुपयाचे लिक्विड खत विनाकारण खरेदी करावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील शेतकऱ्यांची व विक्रेत्यांची कोंडी दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना केली तसेच लिंकिंग सक्ती करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) रासायनिक खते कंपन्यांकडून होणाऱ्या लिंकिंग बंद करण्याबाबतची तक्रार माहे जानेवारी, २०२५ मध्ये विभागास प्राप्त झाली आहे.

(२) प्रत्येक हंगामाच्या सुरुवातीस कृषी विभागामार्फत खत कंपन्या व विक्रेते यांची बैठक घेवुन लिंकींग न करणे बाबत सक्त सुचना दिल्या जातात. मा.मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०१/२०२५ रोजी निविष्ठा संघटनांसमवेत झालेल्या बैठकीत कृषी निविष्ठा उत्पादकास खताची लिंकिंग न करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

कृषी आयुक्तालयाच्या स्तरावरुन राज्यात रासायनिक खतावरील लिकींग होणार नाही. याबाबत व लिंकींग होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित उत्पादक विक्रेते यांचे विरुध्द खत (नियंत्रण) आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ नुसार कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) लागू नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: कोकणातील शेतकऱ्यांच्या काजू फळपिकास योग्य दर मिळणेबाबत

**(३७)** * **३७१ श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कोकणामध्ये काजू तसेच आंब्याचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त असून, तेथे इतर फळांचेही उत्पादन घेण्यात येते, तथापि, कोकणामध्ये शेतीला वणवा लागण्याचे प्रमाण अधिक असल्याने शेतकऱ्यांना अर्थिक नुकसान सहन करावे लागत असतानाही पीक विमा योजनेसारख्या अन्य कोणत्याही योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणात काजू तसेच आंब्याच्या पिकासह इतर फळांच्या पिकांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात दर मिळत नसून GI नामांकन काजू उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनाही योग्य दर मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील शेतकऱ्यांचा काजू उत्पादन खर्च अधिक असल्याने व त्या तुलनेत काजू दर कमी मिळत असल्याने काजूला योग्य दर मिळणेबाबत तसेच काजू व आंबा पिकास विमा योजनेचा लाभ मिळणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक - फवियो-२०२४/प्र.क्र.८१/१० अे, दिनांक १२/०६/२०२४ अन्वये प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना संत्रा, मोसंबी, काजू, डाळिंब, आंबा, केळी, द्राक्ष या फळपिकांना लागू करण्यात आलेली आहे. त्याव्दारे कमी-जास्त पाऊस, वेगाचे वारे, कमी-जास्त तापमान व गारपीट या बाबींपासून विमा संरक्षण व आर्थिक सहाय्य देण्यात येते. यामध्ये एका शेतकऱ्यास सर्व अधिसूचित फळपिकांसाठी ४.०० हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत नोंदणी करण्याची मुभा आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक २७/०३/२०२३ अन्वये नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींना द्यावयाच्या मदतीचे दर व निकष ठरविण्यात आलेले आहे. सदर निकषामध्ये "आग" या बाबीचा समावेश आहे.

(२) याबाबत कोणतेही निवेदन अद्यापपावेतो सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागास प्राप्त झालेले नाही, असे त्या विभागाने कळविले आहे.

(३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, काजूमं-०९२४/प्र.क्र.६८/ २१ अ, दिनांक ०९/०७/२०२४ अन्वये राज्यातील "काजू बी" करीता प्रती किलो रुपये १०/- प्रमाणे किमान ५० किलो व कमाल २००० किलो या मर्यादेत शासन अनुदान घोषित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जमातीच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मूलभूत सोई-सुविधा पुरविण्याबाबत

**(३८) * ४३७ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी २९७ आश्रमशाळा असून शासनाकडे मुबलक प्रमाणात निधी असूनही विद्यार्थ्यांना मूलभूत सोई-सुविधा मिळत नसून परदेशात उच्च शिक्षणासाठी जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी फक्त ४० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत असल्याचे राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या माहे, जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्यातील अनुसूचित जमातीच्या आश्रमशाळांमध्ये सुधारणा करण्यासाठी व परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होण्याच्यादृष्टीने तसेच शिष्यवृत्ती मिळण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक वुईके :** (१) अंशत: खरे आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण ४९७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

परदेश शिष्यवृत्ती योजना सन २००५-०६ पासून सुरु करण्यात आली असून आजपर्यंत ५७ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

(२) शासकीय आश्रमशाळामध्ये मूलभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने जागेची व निधीची उपलब्धता तसेच त्या ठिकाणची गरज विचारात घेऊन आश्रमशाळा संकुलाच्या बांधकामाकरीता नवीन टाईप प्लॅननुसार शालेय इमारत, मुलांचे व मुलींचे वसतिगृह, शालेय इमारत, बहुद्देशिय सभागृहाचे बांधकाम करण्यात येत आहे. एकूण ४९७ आश्रमशाळांपैकी ८४ ठिकाणी काम पूर्ण होऊन हस्तांतरीत करण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत २५३ ठिकाणी आश्रमशाळा संकुलाची बांधकामे तसेच १८२ ठिकाणी शासकीय आश्रमशाळा दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

उक्त ४९७ आश्रमशाळांपैकी १२१ आदर्श आश्रमशाळा विकसीत करण्याच्या अनुषंगाने त्याठिकाणी ICT LAB, SCIENCE LAB, ग्रंथालय, संगीत व कला कक्ष, पुरेसे शौचालय व मुला/मुलींकरीता स्वतंत्र व सुसज्ज वसतिगृह इमारत, भोजनालय व बहुद्देशिय सभागृह, कर्मचारी निवासस्थान, स्वतंत्र सिकरुम, संरक्षण भिंत, CCTV कॅमेरे यासारख्या भौतिक कामांना मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच अत्याधुनिक डिजिटल शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता "Digital Environment" प्रकल्प सुरु करण्यात आला असून त्यामध्ये डिजिटल क्लासरुम, व्हर्च्युअल क्लासरुम, टॅब लॅब, स्टुडिओ, फेशियल बायोमॅट्रिक इत्यादीचा समावेश करण्यात आलेला आहे.

परदेश शिष्यवृत्तीचा लक्षांक दिनांक ०७/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रति वर्षी १० वरुन ४० करण्यात आलेला आहे.

परदेश शिष्यवृत्तीकरीता स्वतंत्र संकेतस्थळ विकसित केलेले आहे. तसेच योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात येत आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. ते विद्यार्थी वसतिगृह व महाविद्यालयातील इच्छुक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत व तसा कार्यक्रम विभागाने सुरु केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यात वनविभागाचे स्वतंत्र प्रादेशिक कार्यालय स्थापन करणेबाबत

**(३९)** * **९६३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यात बिबट्यांचा वावर वाढला असून नरभक्षक बिबट्याने या ठिकाणी अनेकांचा जीव घेतल्याने परिसरात भितीचे वातावरण पसरले असून पाळीव प्राण्यावरही वन्य प्राण्यांचे हल्ले वाढत असल्याची घटना माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करमाळा तालुक्यात ५५४५ हेक्टर वनक्षेत्र असून सदर वनक्षेत्रात एकच वनरक्षक कार्यरत असल्याने करमाळ्यापासून १०० किमी दूर असलेल्या मोहोळ येथील कार्यालयातून वनविभागाचा कारभार चालविण्यात येत असल्याने परिसरात एखादी घटना घडल्यास मोहोळ येथून पथक पाठवून माहिती घेण्यात येते व तद्‌नंतर त्यावर कार्यवाही केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करमाळा तालुक्याची भौगोलिक परिस्थिती, उपलब्ध वनक्षेत्र, अल्प कर्मचारी, परिसरात होत असणारा बिबट्यांचा वावर व वन्यप्राण्यांकडून पाळीव प्राण्यांवर होत असलेल्या घटनांची नोंद लक्षात घेता करमाळा येथे वनविभागाचे स्वतंत्र प्रादेशिक कार्यालय स्थापन करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) सोलापूर वनविभागांतर्गत करमाळा तालुक्यातील वनक्षेत्रामध्ये माहे जानेवारी, २०२४ ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे पशुधनाचे नुकसान झाल्याच्या ३८ घटना निदर्शनास आल्या आहेत.
(२) व (३) वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मोहोळ यांच्या अखत्यारीत करमाळा, माढा व मोहोळ या ३ तालुक्यांच्या समावेश आहे.

करमाळा तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र १६०० चौ.कि.मी असून राखीव वनाचे क्षेत्र ४८०.१० हे व अवर्गीकृत वनाचे क्षेत्र ७४६.२९ असे एकूण १२२६.३९ हे. वनक्षेत्र आहे. त्याकरीता २ वनरक्षक कार्यरत आहे.

मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुपात्रे (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) गावात स्टोनक्रशर सुरु असल्याने घरांना तडे जाऊन नुकसान झाल्याबाबत

**(४०)** * **१०६४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुपात्रे (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) गावात स्टोनक्रशिंग सुरु असून सदर स्टोन क्रशर हे गावातील मराठी शाळा, माध्यमिक शाळा व २०० घरे यापासून ५०० मीटर आतील परिसरात होत असल्याने आठ ते नऊ घरांना तडे गेल्याचे व त्यातून निघणाऱ्या धुळीमुळे २५ शेतकऱ्यांच्या शेतजमिनीवर विपरित परिणाम झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात १०० मीटरवर ओढा असून वारंवार होणाऱ्या स्फोटांमुळे पाण्याचा स्त्रोतांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुपात्रे (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) गावातील स्टोन क्रशिंग लवकरात लवकर थांबविण्याच्यादृष्टीने तसेच त्यामुळे होणारे नुकसान भरुन देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

तहसिलदार, शाहूवाडी यांच्या अहवालानुसार क्रशरमुळे घरांना तडे गेले असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तालुका कृषी अधिकारी, शाहूवाडी यांनी केलेले प्रत्यक्ष स्थळ पाहणीत स्टोन क्रशर शेजारील बहुतांश डोंगर गवतपड जमीन असल्याचे आढळून आले आहे. तसेच शेतजमिनीवर विपरीत परिणाम झाले असल्याचे निदर्शनास आलेले नाही व त्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे नाही.

मौजे सुपात्रे, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर या गावातील ओढा हा २०० मीटर पेक्षा जास्त अंतरावर असल्याचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग कोल्हापूर यांनी स्पष्ट केले आहे. तर वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये उपविभागीय प्रयोगशाळा कोडोली येथे प्राप्त झालेले पाणी नमूने रासायनिक व जैविक घटकांकरीता पिण्यासाठी योग्य असल्याचे आढळून आले आहे. तसेच सुपात्रे येथील भूजलावर आधारित स्त्रोतावर परिणाम झाल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) सन २०२३-२४ मध्ये ग्रामपंचायत सुपात्रे, ता.शाहुवाडी यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडुन करण्यात आलेल्या पाहणीत स्टोन क्रशरने अटी व शर्तीचे पुर्तता करत नसल्याचे व इतर त्रुटी आढळून आल्याने दिनांक ०१/०४/२०२४ रोजी सदर क्रशर बंद करण्यात आले, तद् नंतर क्रशरधारक यांनी अनुपालन अहवाल दिल्याने दिनांक २९/०५/२०२४ रोजी पुन:श्च उत्पादन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. त्याबाबत पुन:श्च तक्रारी प्राप्त झाल्याने सदर क्रशरने संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघनाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयास सदर स्टोन क्रशवर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यातील व कोल्हापूर जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे मासेमारीचे कंत्राट रद्द केल्याबाबत

**(४१) * ६७७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील आदिवासी समुहातील लोकांची मासेमारी कंत्राटाची मुदत संपल्यामुळे आदिवासी समुहातील लोकांनी कंत्राट नुतनीकरणासाठी संबंधित कार्यालयात प्रस्ताव सादर केला असता कंत्राटाचे नुतनीकरण नाकारण्यात आल्यामुळे आदिवासी समुहातील लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी समुहातील लोकांच्या विकासासाठी शासन प्रयत्न करीत असताना आदिवासी समुहातील लोकांचे उक्त प्रस्ताव नाकारण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने उक्त जिल्ह्यातील आदिवासी समुहातील लोकांच्या मासेमारी कंत्राटाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच प्रस्ताव नाकारणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) अ) महाड (जि.रायगड) तालुक्यातील सावित्री, कोथुर्डे, वरंध, खिंडवाडी, खैरे ह्या तलावांच्या ठेक्याचे नुतनीकरण न करण्याचा निर्णय शासन निर्णय दिनांक ०३/०७/२०१९ मधील अट क्र. २६ मधील तरतूदींच्या अन्वयार्थ आधारे दिनांक २३/०८/२०२४ रोजी जिल्हा स्तरीय तलाव ठेका समिती रायगड यांच्याद्वारे घेतला आहे.

ब) कोल्हापूर जिल्ह्यातील आदिवासी समुहातील लोकांची मासेमारी कंत्राटाची मुदत संपल्यामुळे आदिवासी समुहातील लोकांनी नुतनीकरणासाठी संबंधित कार्यालयात प्रस्ताव सादर केला असता कंत्राटाचे नुतनीकरण नाकारण्यात आल्यामुळे आदिवासी समुहातील लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली नाही.
(२) व (३) तथापि, महाड (जि.रायगड) तालुक्यातील सावित्री, कोथुर्डे, वरंध, खिंडवाडी, खैरे तलावांच्या ठेक्याचे नुतनीकरण न करण्याचा जिल्हा स्तरीय तलाव ठेका समिती, रायगड यांच्याद्वारे शासन निर्णय दिनांक ०३/०७/२०१९ मधील अट क्र. २६ मधील तरतूदींच्या अन्वयार्थ आधारे केलेली कार्यवाही उचित दिसून न आल्याने आदिवासी संस्थांनी आयुक्तांकडे दिलेले निवेदन हेच अपिल म्हणून गृहित धरून दिनांक २८/०२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी दिनांक २३/०८/२०२४ रोजीच्या जिल्हास्तरीय तलाव ठेका समिती रायगड यांच्या आदेशास स्थगिती देण्यात आली असून सुनावणीअंती न्यायनिर्णय करण्याची तजविज ठेवण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे महामार्ग आणि पुणे-नाशिक महामार्ग यांना जोडणाऱ्या नवीन चार पदरी रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४२) * ११२४ श्री.योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे महामार्ग आणि पुणे-नाशिक महामार्ग यांना जोडणारा आणि एमआयडीसीकडून तळेगाव-चाकण मार्गाला पर्यायी असणारा १३ किमीचा चार पदरी रस्ता प्रस्तावित असून त्यापैकी खेड तालुक्यातून जाणाऱ्या या रस्त्याचे ८ किमी मार्गाचे काम पूर्ण झाले आहे व उर्वरित ५ किमीपैकी २,१०० मीटर जमिनीच्या अधिग्रहणामुळे या मार्गाचे काम अपूर्ण असल्याचे तसेच प्रातांधिकारी यांच्याकडून पाठविलेला वाढीव दराचा प्रस्ताव जिल्ह्याधिकारी यांच्याकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा संपूर्ण मार्ग सुरू झाल्यास चाकण-तळेगाव रोडवरील ताण कमी होऊन वाहतूककोंडी सुटण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित ५ किमीपैकी २,१०० मीटर जमीन अधिग्रहीत करुन या मार्गाचे काम पूर्ण करुन सदरचा रस्ता लवकरात लवकर सुरु करुन चाकण-तळेगाव रोडवरील वाहतूककोंडी सुटण्यास मदत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) प्रस्तुत, मुंबई-पुणे महामार्ग आणि पुणे-नाशिक महामार्ग यांना जोडणारा आणि एमआयडीसीकडून तळेगाव-चाकण मार्गाला पर्यायी असणारा १३ किमीचा चार पदरी रस्ता प्रस्तावित असून त्यापैकी खेड तालुक्यातून जाणाऱ्या या रस्त्याचे ८ किमी मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ५ किमीपैकी २,१०० मीटर लांबीच्या भूसंपादनाचे काम अपूर्ण असल्याने उपविभागीय अधिकारी, खेड यांनी याबाबत दर निश्चितीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर केला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
हा संपूर्ण मार्ग सुरु झाल्यास चाकण तळेगाव व रोडवरील ताण कमी होऊन वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.
(३) सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दर निश्चिती समितीसमोर दिनांक २७/०२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत ठेवण्यात आला होता.सदर प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेंतर्गतच्या कामांना स्थगिती दिल्याबाबत

**(४३) * १४१६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु करण्यात आलेली ८५०० कामे अद्याप पूर्ण झाली नसल्याचे तसेच आयुक्त, मनरेगा यांनी वैजापूर तालुक्यातील नवीन कामांना किंवा शासनाने मान्यता दिलेल्या परंतु सुरुवात न झालेल्या अशा सर्व कामांना पत्राद्वारे स्थगिती दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्ष होऊनही काही कामांचे देयके न मिळाल्याने कंत्राटदारांकडून कामे बंद करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैजापूर तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत शासनाने मान्यता दिलेल्या परंतु सुरुवात न झालेली कामे पूर्ण करण्याच्यादृष्टीने तसेच मंजूर कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यामध्ये मनरेगा अंतर्गत १३१७५ कामे प्रगतीपथावर असून ७७०४ कामे पूर्ण झालेली आहेत. सदरील १३१७५ प्रगतीपथावर असणाऱ्या कामांपैकी ३३२ कामे रस्त्याशी निगडीत असून या कामांना स्थगिती देण्यात आलेली नाही. आयुक्त मनरेगा यांनी दिनांक ०५/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनूसार वैजापूर तालुक्यामधील अद्याप सुरू न केलेल्या ४२१ सार्वजनिक कामांना स्थगिती दिली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) केंद्रशासनाकडे निधी मिळणेसाठी पाठपुरावा सुरू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मराठवाड्यात कुशल कामगारांची मनरेगा अंतर्गतची कोट्यवधींची देयके निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४४) * १४९२ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ग्रामीण भागातील कुशल कामगारांची सुमारे ७५५ कोटी रुपयांची देयके गेल्या ५ ते ६ महिन्यांपासून प्रलंबित असल्याने याचा परिणाम कामावर होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देयकाची थकीत रक्कम संबंधितांच्या बँक खात्यावर जमा होण्याकरीता लाभार्थींना पंचायत समिती कार्यालयात वारंवार जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित देयकाची रक्कम संबंधित लाभार्थींच्या खात्यात तातडीने जमा होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे अंशतः खरे आहे

(२) हे खरे नाही.

(३) केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या सार्वजनिक व वैयक्तिक कामांवरील कुशल व अकुशल निधीबाबत मा.मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य, मा.मंत्री (रोहयो), मा.सचिव (रोहयो) व मा.आयुक्त, नरेगा, नागपूर यांच्यामार्फत व्यक्तिशः पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) सदरच्या प्रलंबित निधी बाबत मा.मुख्यमंत्री महोदय, मा.मंत्री महोदय, मा.सचिव, मा.आयुक्त व्यक्तिश: केंद्रसरकारकडे पाठपुरावा करीत आहेत.

-----------------

## तहसिलदार, धाराशिव यांनी केलेल्या अनियमिततेबाबत

**(४५) * १५५४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसिलदार, धाराशिव (जि.धाराशिव) यांनी अधिकार क्षेत्राबाहेरील गावांमध्ये रहिवासी भूखंड पाडणे, हरित क्षेत्राचे आराखड्यात बदल करून खुल्या जागा विकासकांना दिल्याचे आणि शासकीय भूखंडांची विक्री केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार कार्यालयात येऊन संचिकांची तपासणी केली असता, त्यांना विद्युत मंडळाकडून 'ना-हरकत' प्रमाणपत्र न घेता उच्चदाब वाहिनीखाली रहिवासी भूखंडांना मंजुरी देणे, लेखा विभागाच्या कॅशबुकवर गत सहा महिन्यांपासून तहसिलदारांची स्वाक्षरी नसणे आणि वर्ग-२ च्या सातबाऱ्याची दुरुस्ती करून वर्ग-१ भोगवटादार मंजूर करणे याप्रकारच्या अनियमितता तहसिलदार यांनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुषंगाने उपविभागीय अधिकारी यांनी चौकशीसाठी तहसिलदार यांचे निलंबन करणे, आवश्यक असल्याचा अंतरिम चौकशी अहवाल जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांकडे पाठवला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अनियमिततेप्रकरणी तहसिलदार, धाराशिव यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) तहसिल कार्यालय, धाराशिव (जि.धाराशिव) येथील अकृषक परवान्याच्या नस्त्या तपासून तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी अंतरिम अहवाल जिल्हाधिकारी, धाराशिव यांना सादर केला होता. या अंतरिम अहवालात तहसिलदार यांनी काही अनियमितता केल्याचे नमूद करण्यात आले आहे. अहवालात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत स्पष्टता येण्यासाठी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाकडून समिती गठीत करण्यात येवून सदर समितीने या मुद्यांची सखोल चौकशी करून शासनास अहवाल सादर करावा असे शासन पत्र दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ अन्वये, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात आले आहे. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून या प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.